सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, ०५ मे २०२४ वर्ष दुसरे अंक ४४ पाने : ८ किंमत रु. ६/-

MGM UNIVERSITY CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
JOIN A RESEARCH-DRIVEN UNIVERSITY
MGMU-CET 2024
16th, 17th & 18th May 2024
Admission Entrance Test
Apply Online
Visit us : www.mgmu.ac.in
Call: 9067612000, 0240-6481111

# बंगालचे नाव तृणमुलमुळे खराब झाले!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ममता सरकारवर हल्लाबोल



कोलकाता : संदेशखालीमध्ये काय घडत आहे हे टीएमसीच्या नेत्यांना नेहमीच ठाऊक होते, परंतु गुन्हेगार त्यांच्यासाठी मालमत्ता असल्याने त्यांनी त्याच्यावर कधीही कारवाई केली नाही. ममता बॅनर्जींच्या तृणमुल पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात पश्चिम बंगालचे गौरवशाली नाव खराब झाले आहे. टीएमसीला संविधानाचे पालन करण्याचे निर्देश देण्यासाठी न्यायालयांना वारंवार हस्तक्षेप करावा लागला आहे, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

देशात लोकसभा निवडणुकीसाठी दोन टप्प्यातील मतदान झाले आहे. आता तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी होणार आहे. या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालमधील कृष्णनगर येथील प्रचारसभेला संबोधित केले. यावेळी नरेंद्र मोदींनी पश्चिम बंगालच्या टीएमसी सरकारवर जोरदार निशाणा साधला. टीएमसीने हे समजून घेतले पाहिजे की, ते काहीही झाले तरी सीएएची अंमलबजावणी थांबवू शकत नाहीत, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

सीएएच्या माध्यमातून मी भारतीय नागरिकत्व मिळवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला खात्री देतो की,त्यांना लवकरच केंद्रीय उपक्रमाचा लाभ मिळेल. तसेच, संदेशखाली प्रकरणावरून सुद्धा नरेंद्र मोदींनी टीएमसीच्या नेत्यांवर निशाणा साधला. याचबरोबर,केंद्र सरकार लोकांना मोफत रेशन आणि आरोग्याच्या सुविधा देत आहे. मात्र, टीएमसी बंगालमध्ये आमचा उपक्रम राबवत नाही. त्यामुळे तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे मोदी म्हणाले. तसेच, बंगालमध्ये आमच्या माजी सैनिकांवर अन्याय होत आहे. या आव्हानात्मक काळात भाजपा तुमच्या पाठीशी उभा आहे आणि तुमचे जीवन सुकर करण्यासाठी माझ्या तिसऱ्या कार्यकाळात केंद्र सरकार तुम्हाला सर्वतोपरी मदत करेल, असे आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिले.

## भावंडांच्या मतभेदातून गोदरेज कंपनीच्या वाटण्या

मुंबई : गोदरेज कुटुंबाने ३० एप्रिल रोजी १२७ वर्षे जुन्या कंपनीला दोन संस्थांमध्ये विभाजित करण्याची घोषणा केली. गोदरेज एंटरप्रायझेस आणि गोदरेज इंडस्ट्रीज – आणि साबण, उपकरणे आणि रिअल इस्टेटमध्ये पसरलेल्या त्याच्या समूहाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. आदि गोदरेज वयवर्षे ८२, आणि त्यांचा भाऊ नादिर वयवर्षे ७३ यांच्याकडे गोदरेज इंडस्ट्रीजच्या पाच सूचीबद्ध कंपन्या आहेत, त्यांच्या चुलत भाऊ जमशीद गोदरेज वयवर्षे ७५ आणि स्मिता गोदरेज कृष्णा वयवर्षे ७४ यांना असूचीबद्ध गोदरेज अँड बॉयस आणि त्यांच्या संलग्न कंपन्यांसोबत मुंबईतील मुख्य मालमत्तेसह एक जमीन मिळेल.

## 'बिग बी'कडून कोस्टल रोड आणि शिंदे-फडणवीस सरकारचे कौतुक!

मुंबई : बहुचर्चित असलेल्या मुंबई कोस्टल रोडच्या पहिल्या दहा किमी अंतराचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यामुळे मुंबईला पश्चिम उपनगराला जोडणे शक्य झाले आहे. अनेकजण या कोस्टल रोडवरुन प्रवास करतानाचे फोटो आणि व्हिडिओ त्यांच्या सोशल मीडियावर शेअर करत असतात. त्यातच आता अमिताभ बच्चन यांनी देखील नुकतेच कोस्टल रोडवरुन प्रवास करत त्यांचा अनुभव शेअर केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी शिंदे-फडणवीस यांच्या सरकारचे देखील कौतुक केले आहे. त्यांच्या या ट्विटर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखिल अगदी फिल्मी स्टाईल रिप्लाय दिला आहे. मुंबई ते कांदिवली असा या कोस्टल रोडचा प्रकल्प आहे. दक्षिण कोस्टल रोड हा १०.५८ किमी लांबीचा आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च हा १२,७२१ कोटी रुपये आहे. नुकतेच लोकार्पण झालेल्या अटल सेतूवरही अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यानंतर आता कोस्टल रोडच्या कामाचे देखील कौतुक होत असल्याचे पाहायला मिळत आहे.




# संत एकनाथांना मोसंबीचा आरास

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ : श्रीक्षेत्र पैठण येथील गावातील नाथ मंदिरात श्रीविजयी पांडुरंग व श्रीसंत एकनाथ महाराज यांना चंदन उटी पूजा संपन्न झाली.यावेळी पैठण येथील समस्त ब्रह्मवृंद यांच्या उपस्थितीत मंत्रजागर व सर्वांना कैरीचे पन्हे व टरबूज प्रसाद वाटप करण्यात आला. यावर्षीची ही द्वितीय चंदन उटी पूजा होती.यावेळी जवळपास २०० किलो हुन अधिक मोसंबी फळाची आरास करण्यात आली..यावेळी पुराणाचार्य डॉ. प्रसाद महाराज भागवत , डॉ. विशाल शास्त्री दाणी , वेदमुर्ती श्री.परीक्षित वैद्य , वेदमुर्ती श्री.प्रकाश काका वैद्य , कपिल काका कावसनकर , भाऊसाहेब तोघे , बनकर , अंकुश हक्कम , गणेश चिंधे , चैतन्य औताडे , तेजस छडीदार यांनी अथक परिश्रम घेतले. या आरास पुजेचे मार्गदर्शक नाथवंशज हभप गुरु श्री.रावसाहेब महाराज गोसावी ( सालकरी ) हे होते.



# करदाते, नोकरदारसह उच्च उत्पन्न गटातील ५ लाख शेतकरी अपात्र!

## पीककर्ज प्रोत्साहनपर अनुदान योजना

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

महात्मा जोतिराव फुले कर्ज मुक्तीअंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ घेण्यासाठी तीन आर्थिक वर्षांपैकी दोन वर्षांत कर्ज घेऊन त्याची परतफेड करण्याची अट होती. मात्र, एक वर्ष कर्ज घेऊन त्याची परतफेड केल्याने ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना अपात्र ठरविले आहे. ५ लाख शेतकरी आयकरदाते, नोकरदार असल्याने अपात्र ठरले आहेत.

प्राप्त माहितीनुसार सध्या प्रोत्साहन अनुदान याजनेतील केवळ ५६ खाती प्रलंबित आहेत. त्यापोटी २५ लाख रुपयांचे अनुदान देणे बाकी आहे.

### कोरोनामुळे अडथळा

२०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्याच अधिवेशनात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महात्मा फुले कर्जमुक्ती योजना जाहीर केली. याअंतर्गत तीन वर्षे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा केली होती. या योजनेत कर्जमाफीची प्रक्रिया पार पडली. मात्र, अनुदान योजना राबविण्याच्या टप्प्यातच कोरोनाचे संकट आल्याने ती रखडली गेली होती. कोरोनानंतर ही योजना राबविण्याची घोषणा केली. मात्र, दरम्यानच्या काळात महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर सत्तेत आलेल्या महायुती सरकारने ही योजना मार्गी लावत टप्प्या-टप्प्याने अनुदान वाटप केले. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या अधिवेशनात म्हणजे जुलै २०२२ मध्ये ४७०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सप्टेंबर २०२२ मध्ये २५०० कोटी रुपये, दुसऱ्या टप्प्यात ऑक्टोबर २०२२ मध्ये ६५०, जानेवारी २०२३ मध्ये ७०० कोटी रुपये असे ३७०० कोटी रुपये वितरित केले होते. त्यानंतर १००० कोटी रुपये वितरित करण्यात आले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी २८ लाख ६० हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले. त्यापैकी १४ लाख ९३ हजार शेतकरी पात्र ठरले होते. यापैकी १४ लाख ३९ हजार शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात आले. त्यापैकी १४ लाख ३८ हजार शेतकऱ्यांना ५२१६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

### ...यांना ठरविले अपात्र!

**या योजनेतील शेतकरी करदाते, नोकरदार आणि उच्च उत्पन्न गटातील असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांना अपात्र ठरविले आहे. आजी माजी मंत्री, राज्यमंत्री, माजी लोकसभा, राज्यसभा सदस्य, माजी विधानसभा, विधान परिषद सदस्य, केंद्र व राज्य सरकारचे सर्व अधिकारी, कर्मचारी या योजनेसाठी अपात्र ठरविण्यात आले आहेत. मात्र, ज्या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन २५ हजार रुपयांच्या आत आहे, त्यांना पात्र ठरविले आहे. परिवहन उपक्रमांतील २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन असलेले अधिकारी व कर्मचारीही या योजनेत अपात्र ठरले आहेत. माजी सैनिक वगळता निवृत्ती वेतनधारक, बाजार समिती, साखर कारखाने, सूतगिरणी, नागरी सहकारी बँका, जिल्हा बँका, दूध संघांच्या अधिकाऱ्यांना हाच निकष लावला आहे.**

# तुमच्यावर नजर ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा; पुण्यातील अकार्यश्रम नगरसेवकांना खडसावले

पुणे : लोकसभा निवडणुकीमध्ये पुण्यातील मतदारसंघांत ७ मे आणि १३ मे अशा दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. मात्र निवडणुकीच्या रणधुमाळीत काही नगरसेवक मला काय त्याचे या आविर्भावात आहेत. प्रचाराकडे त्यांनी सपशेल दुर्लक्ष केले आहे. अशा नगरसेवकांनो, तुमच्यावर नजर ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा राबवली आहे, अशा खरमरीत शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकार्यश्रम नगरसेवकांचे कान टोचले.



पुणे जिल्ह्यातील बारामती मतदारसंघासाठीचे मतदान ७ मे रोजी, तर उर्वरित पुणे, शिरूर, मावळ या मतदारसंघांसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. याठिकाणी महायुतीचे तिन्हीही उमेदवार निवडून आणले पाहिजे. आणि जो काम करेल, त्याचा निकाल शंभर टक्के उत्तम असणार आहे, त्यामुळे त्यांच्या पाठिशी मी आहे. मात्र 'भाजपा' नाही म्हणून मित्रपक्षांचे चिन्ह पोहोचले नाही, अशी कारणे नको आहेत, पण पुण्यातील उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आला पाहिजे, असेही फडणवीस यांनी बजावून सांगितले.

पुण्यातील एका अलिशान हॉटेलमध्ये महायुतीच्या कार्यकर्ते आणि आजी- माजी नगरसेवकाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये महापालिकेचे माजी नगरसेवकांनी देखील हजेरी लावली. आणि जे पदाधिकारी गैरहजर होते, ते का हजर नाहीत, याची माहिती यावेळी फडणवीस यांनी या वेळी घेतली. या बैठकीमध्ये फडणवीस यांच्या सोबत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ, कार्यकर्ते, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे आणि ५० पेक्षा जास्त माजी नगरसेवकांनी हजेरी लावली होती. पुणे लोकसभा मतदारसंघातील काही नगरसेवकांनी प्रचाराच्या वेळेस केलेल्या हलगर्जीपणाविषयी फडणवीस यांनी चांगलाच समाचार घेतला. 'या प्रचारामध्ये माझे सर्वांवर करडी नजर आहे. त्यासाठी आपली स्वतंत्र यंत्रणा कामाला लावली आहे. कोण काय करत आहे, याची थेट माहिती मला मिळत आहे. प्रचारामध्ये छोट्या सभा घेणे अत्यंत महत्वाचे आहे. अगदी १५ ते २० नागरिकांना एकत्र करून त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे मत जाणून घेणे महत्वाचे आहे. अशा लहान- मोठ्या सभांचा फायदा नागपूर मध्ये उत्तम झाला आहे.

# बिडकीन जवळ दोन दुचाकींच्या समोरासमोर धडकेत एक तरुण ठार, दोन जण जखमी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि.४ मे पैठण रोड वरील बिडकीन येथील सहयोगनगर जवळ दुर्गा पब्लीक स्कूल समोर दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत एक तरुण ठार झाला तर दोन तरुण जखमी झाले आहेत.दि. ३ शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजे दरम्यान पवन लक्ष्मण घुगे (वय २६ ) व किरण भास्कर हाडे (वय २५) दोघेही (रा .बिडकीन ता. पैठण) हे दोघे एम एच २० डि जी ८९३३ या दुचाकीने बिडकीनकडे येत होते तर नितीन गोरखनाथ मोरे (वय २५ ) व त्याचा भाऊ दोघेही रा.बिडकीन हे एम एच २० एफ बी ७५६४ दुचाकीने बिडकीनवरुन छत्रपती संभाजीनगर कडे स्वतःच्या दिवाण नगर कडे वळण घेत होते. बिडकीन येथील सहयोगनगर येथे दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. पवन घुगे हा किरण हाडेच्या दुचाकीवर पाठीमागे बसलेला होता तो दुचाकीच्या धडकेत पाठीमागून पुढे फेकल्या गेला व त्याचे डोके दगडावर आदळले डोक्याला व छातीला गंभीर जखम झाली असून ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता डॉ. आशिष वेदपाठक यांनी मयत घोषित केले तर किरण हाडे व नितीन मोरे हे दोघे खाजगी रूग्णालयात उपचार घेत आहे. तर पवन घुगे याच्यावर सकाळी बारा वाजेच्या सुमारास बिडकीन येथील शेकटा रोडवरील सार्वजनिक स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**छत्रपती संभाजी नगर ते पैठण रोडचे काम संथ गतीने सूरू असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला मातीचे ढीगार आणि मोठे दगड पडलेले असून यामुळे वारंवार अपघात होत असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे**



## भाग ०६ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड

# विकासाला विरोध नाही पण झाडे जगवली पाहिजे

### नागरिक व निसर्ग प्रेमींची भूमिका

**तभा वृत्तसेवा/सहयोग प्र.जावळे**

कन्नड, दि.०५ एप्रिल – कन्नड तालुक्याला मराठवाड्याचे प्रवेशद्वार मानले जाते.उत्तर भारत व दक्षिण भारताला जोडणाऱ्या धुळे सोलापूर महामार्गामुळे केवळ दोन भाग नव्हे तर खानदेश व मराठवाडा भिन्न संस्कृती,भिन्न बोली भाषा असलेले प्रदेश जोडले गेले.या महामार्गामुळे रस्त्यावरील वर्दळ प्रचंड प्रमाणात वाढली.विकासाची गंगा कन्नड सारख्या दुर्लक्षित तालुक्या पर्यंत पोहचली.या महामार्गामुळे तालुक्याच्या वैभवात लक्षणीय वाढ झाली.अनेक कारणाने विकासापासून दूर असलेला हा तालुका जगाच्या नकाशावर आला.जागतिक दर्जाच्या महामार्गामुळे दळणवळण सुविधेत वाढ झाली.इंधनाचा खर्च कमी झाला.या सर्व कारणांमुळे कन्नड तालुक्याचे अर्थकारण सुधारले आहे. त्यामुळे महामार्गाच्या रूपाने झालेल्या विकासाला नागरिकांचा विरोध नाही मात्र हा महामार्ग ओसाड झाला याला विरोध आहे.

या महामार्गाच्या बांधकाम काळात येथील ऐतेहासिक व वैभवशाली वृक्ष तोड करण्यात आली.त्याऐवजी महामार्ग प्राधिकरण प्रशासनाने इंडियन रोड कॉंग्रेस यांच्या निकषांनुसार रस्त्याच्या मध्यभागी शोभिवंत झाडे व दुतर्फा वृक्ष लागवड करण्याचा खाजगी कंपनीला कंत्राट दिला.मात्र गेल्या तीन वर्षात या कंपनीने या कामाकडे दुर्लक्ष केल्याने हा महामार्ग ओसाड झाला आहे.





**या महामार्गामुळे परिसराचा विकास झाला, आमचा या विकासाला विरोध नाही मात्र झाडे जगली व वाढली पाहिजे अशी आमची भूमिका आहे. रस्त्यालगतची झाडे केवळ सावली देत नाही तर हे झाडे ऑक्सीजन देतात,कार्बन डाय ऑक्साईड शोषून प्रदूषण कमी करतात. वाहनातील इंजिन मधील ज्वलनातून निर्माण झालेले घातक प्रदूषके शोषून हवा स्वच्छ करतात. रस्त्यावरील धूली कानांना आपल्यात सामावून दृश्य मानता वाढवतात.याच वृक्षांखाली अनेक शेतकरी आपला शेतीमाल विकून व्यवसाय करतात.शेतकरी थेट ग्राहकाला शेतीमाल विकत असल्याने शेतकऱ्यांच्या पदरात दोन पैसे जास्त पडतात. मात्र हा महामार्ग ओसाड झाल्याने वरील सर्व फायद्याला आपण मुकत आहोत.**

**डॉ.रमेश सुर्यवंशी : इतिहासकार,निसर्गप्रेमी**

**झाडांना जोपासने हे आमचे कर्तव्य आहे आणि आम्ही त्या पद्धतीने काम करत आहोत,पण बरेच शेतकरी झाडे तोडून टाकतात,काही जनावरांनामुळे झाडे तुटत आहेत त्यामुळे झाडांचे संगोपन करताना मोठा त्रास होत आहे त्यातचं मुरूम मिश्रित माती असल्याने झाडे जगवताना मोठी कसरत होत आहे,शेतकऱ्यांनी सुद्धा झाडांचे संगोपन करण्यासाठी मदत करावी जेणेकरून सर्व झाडे जगतील,**

**– रवींद्र इंगोले, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

**अनादी काळापासून या रस्त्यावर झाडे आहेत.या झाडांना या परिसरातील शेतकरी व नागरिक जीवापाड जपत होते.महामार्ग बांधकाम करतांना हे वृक्ष तोडण्यात आले.त्याऐवजी चौपट ते पाचपट वृक्ष लावण्याचे आश्वासन महामार्ग प्राधिकरणाने दिले होते.त्या आश्वासनांचा आधारावरच नागरिकांनी व निसर्ग प्रेमींनी जुने वृक्ष तोडण्याची संमती दिली होती.मात्र प्राधिकरणाने आपले आश्वासन पाळले नाही.हा महामार्ग ओसाड केला.या महामार्गाला पूर्व वैभव प्राप्त झाल्याशिवाय आम्ही कंपनीला सोडणार नाही.या उन्हाळ्यात कंपनीने आहे त्या झाडांना जगविणे,पावसाळ्यात बाद झालेले सर्व झाडे लावणे व दुतर्फा सर्व झाडांना सुरक्षा जाळी बसवणे.अन्यथा लोकशाही मार्गाने आम्ही जन आंदोलन उभारू.कायद्याप्रमाणे न्यायालयात दाद मागू.**

**उदय गवळी, सामाजिक कार्यकर्ता**

**महामार्गाच्या दुतर्फा लावलेल्या झाडांना सुरक्षा जाळी लावणे आवश्यक होते.मात्र कंपनीने निकष डावलून जाळ्या लवल्याच नाही.आम्ही १२ महिने २४ तास याच परिसरात असतो.या काळात एकाही झाडाला सुरक्षा जाळी लावल्याचे आम्ही पाहिले नाही.उलट प्राधिकरणाचे अधिकारी म्हणतात की,आम्ही सुरक्षा जाळ्या लावल्या होत्या ,त्या चोरीला गेल्या.आमचे प्राधिकरणाला सांगणे आहे की,आमच्या पूर्वजांनी आतापर्यंत येथील झाडांची स्वतः जोपासना केली त्यांची निगा राखली त्या झाडांवर मनापासून प्रेम केले असे शेतकरी या जाळ्या कशा चोरणार? जाळ्या लावल्याच नाही तर चोरण्याचा प्रश्नच नाही.उलटा चोर कोतवाल को डाटे असा हा प्रकार आहे.**

**जगन्नाथ खोसरे, शेतकरी,सामाजिक कार्यकर्ते गल्लेबोरगाव.**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## खामसवाडी आरोग्य केंद्राची इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत; छावाचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.४ मे -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील शिवपुर वस्ती येथे नुतन बांधकाम केलेली इमारत उद्घाटन न झाल्यामुळे शोभेची वास्तू बनली आहे.

गत दोन वर्षांपासून या इमारतीचे पंच्याहत्तर लाख रुपयांचे बांधकाम झालेले आहे. सद्यस्थितीत या इमारतीच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या असून परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या इमारतीच्या आवारात पशु प्राण्यांचा वावर वाढल्याने हि इमारत कशासाठी बांधली अशी चर्चा गावकरी करीत आहेत.

याबाबत अखिल भारतीय छावा संघटना आक्रमक झाली असून याविषयीचे निवेदन छावा जिल्हाध्यक्ष दिनेश पाटील यांनी कळंब आरोग्य अधिकारी यांना दिले आहे. सदरील इमारतीचे वेळेत उद्घाटन होऊन रुग्णांसाठी खुली व्हावी अन्यथा येणाऱ्या कांही दिवसात छावा स्टाईल कडक आंदोलन केले जाईल असा इशारा छावाचे दिनेश पाटील यांनी दिला आहे.






### संक्षिप्त वृत्त...

#### जळकोट येथे गोरोबा काका पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**जळकोट, दि.४ मे -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील मानमोडी- जळकोट रोडवर असलेल्या श्री संत गोरोबाकाकांच्या ७०७ व्या पुण्यतिथीनिमित्त मंदिर समितीच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संत गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीनिमित्त गोरोबाकाका मंदिरात रविवार (दि.५) रोजी रात्री नऊ ते अकरा या वेळेत सारोळा (ता. बार्शी) येथील हभप. उत्तम महाराज गाटे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. सोमवार (दि.६) रोजी गोरोबाकाकांच्या मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी एक वाजता गुलाल उधळण्याचा कार्यक्रम पार पडणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास जळकोट व परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संत गोरोबा काका मंदिर समितीचे भीमाशंकर कुंभार यांनी केले आहे.





#### लोहारा प्रशालेला ६५ हजार रुपयांचे सायकल स्टॅन्ड भेट

**लोहारा, दि.४ मे -**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून प्रशालेचे निवृत्त मुख्याध्यापक वसंत राठोड यांनी हायस्कुल लोहारा प्रशालेला ६५ हजार रुपये खर्च करून ५० सायकलीसाठी सायकल स्टॅन्ड तयार करून दि.१ मे रोजी शाळेला भेट दिले. मुलांची सायकल चालवण्याकडे कल वाढावा व प्रदूषण मुक्ततेकडे वाटचाल व्हावी, हा उद्देश समोर ठेवून सायकलीसाठी सायकल स्टॅन्ड तयार करून शाळेला भेट दिली. यासोबतच प्रशालेचे सध्याचे शिक्षक सतीश जट्टे यांनी त्यांचे वडील कै. तमन्नप्पा महादेवआप्पा जट्टे यांच्या स्मरणार्थ प्रशालेची गरज ओळखून ५१ हजार रुपये किंमतीचे संगणक, प्रिंटर संच व त्यासाठीचे आवश्यक फर्निचर शाळेस भेट दिले. याप्रसंगी मुख्याध्यापक डी.एम. पोद्दार, वैजनाथ होळकुंदे, आर.के. पोद्दार, श्याम पोद्दार, माणिक तिगाडे, नंदा राठोड, प्रशालेचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

#### उमरगा जनता बँकेला आर्थिक वर्षात ७ कोटीचा नफा

**उमरगा, दि.४ मे -**

बँकेचे संस्थापक तथा राज्याचे माजी मंत्री लोकनेते बसवराज पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली व जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली २०२३-२०२४ या संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेस ६.७० कोटी रुपये ढोबळ नफा झाला आहे. बँकेचा स्वनिधी मध्ये देखील चांगली वाढ होऊन स्वनिधी रु. २६.१२ कोटी एवढा झाला आहे. बँकेकडे रु. २०९ कोटींच्या ठेवी असून सभासदांना १०० कोटीचे कर्ज वाटप करण्यात आलेले असून, गुंतवणूक ७६ कोटी ५८ लाख रुपये एवढी आहे. मार्च २०२४ अखेर बँकेचे खेळते भाग भांडवल २६६ कोटी एवढे आहे. सभासदांच्या सहकार्याने बँकेचे नेट एन.पी.ए. केवळ ३.७३ टक्के राखण्यात यश संपादन केले आहे.



#### राष्ट्रीय बंजारा संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शिवाजी राठोड

**जळकोट, दि.४ मे -**

येथून जवळच असलेल्या आलियाबाद येथील रहिवाशी व सध्या मुंबई येथे डीएचसीचे चीप फायनान्स ऑफिसर या पदावर कार्यरत असलेले, मुंबई जनरल कामगार सभेचे जनरल सेक्रेटरी व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व्हीजेएनटी सेलचे माजी सरचिटणीस शिवाजी भीलू राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषद संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल धाराशिव जिल्हा, आलियाबाद, जळकोट परिसरातील विविध संघटना मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

#### मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई

**जळकोट, दि.४ मे -**

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.३ मे रोजी मोटार वाहन कायदा - नियम भंग प्रकरणी एकुण ११६ कारवाया करुन ७२ हजार ७०० रूपये 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे.

## जिल्ह्याच्या विकासासाठी घड्याळाचा मत द्या : डॉ. तानाजी सावंत

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.४ मे -**

धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी केले आहे. कळंब तालुक्यातील खामसवाडी, मोहा, शिराढोण येथील प्रचाराच्या जाहीर सभेतून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील, सुधीर पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, भाजपा कळंब तालुकाध्यक्ष अजित पिंगळे, शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख अनिल खोचरे, खामसवाडीचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच किरण पाटील, संजय पाटीलआदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. सावंत म्हणाले की, राज्याचा आरोग्यमंत्री असल्याचा अभिमान आहे. कोविड काळात केलेले काम असो की आरोग्य विभातील सर्व डॉक्टर, आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांनी केलेले काम असो याचं योग्य नियोजन झाल्याने राज्यातील अनेक रुग्णांना फायदा झाला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेमुळे राज्यात अनेक आरोग्यदायी योजना राबविण्यात आल्या.

माझ्या या आरोग्य खात्याचे पुस्तक काढून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा शासित राज्यात पाठवले आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

गतवेळेस मोठ्या हिमतीने ओमराजेंना लोकसभेवर पाठवले. परंतु मोबाईलवर बोलण्याव्यतिरिक्त त्यांनी काहीच केले नाही. खासदार पंतप्रधान मोदींवर बोलतात हे मोठे दुर्दैव आहे.

डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याकडून तेरणा कारखाना घेतल्या नंतर ओमराजे व त्यांच्या मामा गोतवळ्याने कारखान्यातील सगळे सामान भांगारत घातले. यामुळे तेरणाचे दिवाळे निघाले. खासदार म्हणुन केलेले विकास काम दाखव जनतेची दिशाभुल करणे बंद करा, भावणीकतेच राजकारण तेवड्यापुरतेच असते त्यामुळे लबाडी बंद करा, असेही रोखटोक मत डॉ. सावंत यांनी मांडले.



नवीन खासदार अर्चनाताईंच्या माध्यमातून मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हक्काने भांडून धाराशिव जिल्हा आकांक्षीत वगळून विकासात्मक योजना राबविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मोहा, खामसवाडी व शिराढोण येथे संध्याकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत डॉ. तानाजी सावंत यांच्या धावत्या सभा पार पडल्या.

मोहा, खामसवाडी, शिराढोण येथील प्रचार सभेला मतदार यांनी गर्दी केली होती.

## भगव्या पताक्यानी व गोरोबा, ज्ञानोबा, तुकोबाच्या जयघोषाने तेर नगरी दुमदुमली







### तेरणाकाठी भरला वैष्णवांचा मेळा...

**तभा वृत्तसेवा / विकास भोरे**
**तेर, दि.४ मे -**

प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव तालुक्यातील तेर येथील वारकरी संप्रदायातील थोर संत संतपरीक्षक श्री संत गोरोबा काकांच्या वार्षिक पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून शेकडो वारकरी दिंड्या व भाविक गोरोबाकाकांच्या समाधी स्थळाच्या दर्शनसाठी तेर नगरीत दाखल झाले आहेत. गोरोबा काकांच्या ७०७ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त तेर नगरीत वैष्णवांचा मेळा भरला आहे.

त्यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती मंदिर ट्रस्टचे प्रशासक सह धर्मदाय आयुक्त रू. र. कोरे-बारवडे, निरीक्षक अतुल नळणीकर व व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांनी दिली.

वरुथनी एकादशीची महापूजा, आमदार राणाजगजितसिंह पाटील, मंदिर ट्रस्टच्या प्रशासक सह धर्मदाय आयुक्त रू.र. कोरे-बारवडे, रचना कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रेय मुळे, प्रशांत वाघ, रवींद्र कोरे यांच्या हस्ते करण्यात आली.

गोरोबाकाकांच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. हजारो भाविकांनी समाधी स्थळाचे दर्शन घेतले. ऊणाची तीव्रता जास्त असल्याने तेर येथील नागरिकांनी येणाऱ्या भाविकांना विविध ठिकाणी थंड पाण्याचे जार, केळी फळे, फराळाचे वाटप करण्यात आले.

आलेल्या संत महंताच्या पालख्यांनी टाळ मृदंग, गोरोबा-ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरात भगव्या पताका हातात घेऊन ग्राम प्रदक्षिणा करण्यात आल्या.

मंदिराचे पुजारी धनंजय महाराज पुजारी, रघुनंदन महाराज पुजारी, पृथ्वीराज पुजारी, लोकरे महाराज यांनी समाधी स्थळ व मंदिराचा गाभार्याची आकर्षक फुलांनी सजावट केली होती.

## ओमराजे म्हणजे परमनंट कंपनीची परमनंट गॅरंटी : दिलीप सोपल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मे -**

ओमराजे निंबाळकर यांना जनतेतुन मिळत असलेल्या प्रेम पाहुन विजयाची गॅरंटी आहे. ही टेम्परारी कंपनीची परमनंट गॅरंटी नाही तर परमनंट कंपनीची परमनंट गॅरंटी असल्याचे मत दिलीपराव सोपल यानी व्यक्त केले. महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ वैराग येथील आयोजीत प्रचार सभेत ते बोलत होते.



यावेळी सोपल म्हणाले की, खासदार कसा असावा, त्याचे काम कसे असते हे ओमराजे यानी दाखवुन दिले आहे. बाकीचे फक्त आश्वासन देतात, पण ओमराजे हे करुन दाखवतात. विरोधी पक्षाचे नेत्यांच्या डोळ्यात त्यांनी अंजन घातले आहे. ओमराजेच्या सभेसाठी लोक पदरमोड करुन येत असल्याचे दिसत आहे, यावरुन त्यांच्या विजयाची गॅरंटी आहे. विशेष म्हणजे लोक त्यांच्या सभेतच येत नाहीत, तर त्याना निवडणुकीसाठी देणगी देत असल्याचे सांगुन सोपल यांनी स्वतः आलेला अनुभव देखील सांगितला. एक दुसरीत शिकणाऱ्या मुलीने स्वतःच्या खाऊसाठी जमविलेले पैशाचा गल्ला सोपल यांच्याकडे सुपुर्त केल्याचे त्यानी सांगितले. ही देणगी ओमराजेकडे पोहचवा असे मला त्या मुलीने सांगितले, असे प्रेम मिळायला खरोखर भाग्य लागते. त्यामुळे ओमराजे तुम्ही भाग्यवंत आहात अशीही प्रशंसा सोपल यानी यावेळी केली.

या तालुक्याचे प्रेम तुम्ही कमविले असुन एवढं प्रेम या अगोदर कोणत्याही खासदाराला मिळाले नसल्याचे सोपल यांनी सांगितले.

## ओम राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ आ. पाटील, सहसंपर्कप्रमुख बोरकर यांच्या सभा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

धाराशिव तालुक्यातील आळणी, वडगाव सि., उतमी कायापुर याठिकाणी महाविकास आघाडीचे खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार कैलास पाटील, धाराशिव शिवसेना सहसंपर्कप्रमुख शंकरराव तात्या बोरकर यांची सभा पार पडली.

यावेळी आमदार कैलास दादा पाटील यांनी भाषणात सांगितले की .खाद्य तेल सोयापेंड आयात केली. यातुन फायदा कुणाचा शेतकऱ्यांच्या मुळावरच हे सरकार आहे. पाण्याची बाटली २० रूपयाला शेतकऱ्यांच्या दुधाला २२ रूपये कैलास पाटील यांनी केले. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख शंकरराव बोरकर यांनी सर्व ओबीसी समाज बांधव यांना आवाहन केले. मोदी यांनी आपल्या देशाची कशी वाट लावली.तरूणाला कसं बेरोजगार केलं याचा पाढाच वाचला.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख विजयकुमार सस्ते, पं.स. सदस्य संग्राम देशमुख, विनोद वीर, रवि कोरे, विनोद लावंड, अंकुश मोरे, गजेंद्र जाधव, श्रीपाल वीर, वैभव वीर, राजाभाऊ किरदत्त, अनंत खोबरे, अनंत वीर, राज दादा वीर, विश्वजीत वीर, शाम सुंदर लावंड, सचिन देशमुख, अजित वीर, आण्णासाहेब कदम, यांच्यासह शिवसैनिक नागरिक उपस्थित होते.

## मुरुम शहरात अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारासाठी भाजपा पदाधिकाऱ्यांकडून घरभेटी

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.४ मे -**

धाराशिव लोकसभेच्या महायुतीचे उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारासाठी मुरूम शहरातील भाजपाचे पदाधिकारी शहरातील प्रत्येक वार्डात मतदारांना भेटी घेत असून यासाठी मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.



शहरातील अनेक भागात कॉर्नर बैठक घेण्यात येत आहेत. या बैठकीत केंद्र शासनाने राबवलेल्या योजनाबद्दल माहिती देण्यात येत आहे. भाजपचे मुरूम शहराध्यक्ष गुलाब डोंगरे, उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिनियार यांच्या नेतृत्वाखाली ह्या कॉर्नर सभा आणि घरभेटी घेण्यात येत आहेत. पंतप्रधान आवास योजना, उज्वला गॅस योजना, शौचालय निधी, स्वच्छता, मुद्रा योजना, शेतकरी सन्मान योजना अश्या अनेक योजनेबद्दल प्रचार करून पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना प्रधानमंत्री करण्यासाठी मतदारांना मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. शहरातील बूथ क्रमांक २३० मधील झालेल्या कॉर्नर बैठकीत बूथ अध्यक्ष आकाश क्षीरसागर धनराज वाडीकर, दत्तू गिरीबा, सचिन खज्जे बाळासाहेब गिरीबा, हारूण कागदी, सुनील नरवडे, सिद्धू हिरेमठ, मनीष ब्याळे व इतर कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

विशेष करून या भागातील महिलांनी चर्चेत सहभाग नोंदवून मोदी यांनी केलेल्या कामाबद्दल आम्ही मतदान करणार आहोत असे सांगितले.

## आचार्य तांडा ग्रामस्थांचा लोकसभा मतदानावर सामूहिक बहिष्कार

### घर जागेच्या नोंदी ग्राम पंचायत दप्तरी करा...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.४ मे -**


शासन एकीकडे मतदानाचा टक्केवारी वाढावा यासाठी प्रयत्न करीत आहेत तर दुसरीकडे मात्र उमरगा तालुक्यातील अंबर नगर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या आचार्य तांडा येथील ग्रामस्थांनी राहतं घर जागा ग्रामपंचायतला नोंदणी करून मालकी हक्क करून द्यावेत अन्यथा लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार नाही, अश्याप्रकारची मागणी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आमच्या तांड्यातील जागा प्रत्येक कुटुंबीयांच्या नावे मालकी हक्क नोंद करून मिळावेत. संपूर्ण तांड्यातील कुटुंबांची घरांची जागा नोंद भोगवटा खाली नोंद आहे. येथील घराची नोंद भोगवटाखाली असल्याने त्या कुटुंबीयास घरकुलासह अन्य शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून देखील शासन आमची दखल घेत नाही असा निवेदनाद्वारे आरोप करीत वैतागलेल्या ग्रामस्थांनी आमच्या मागण्या शासनाने मान्य न केल्यास ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. आचार्य तांडा येथे एकूण १२० कुटुंब वास्तव्यास असून पाचशेच्या जवळपास लोकसंख्या आहे. गेल्या शंभर वर्षापासून येथे बंजारा समाज वस्ती करून वास्तव्यास राहत आहेत. लोकसभा किंवा विधानसभेची निवडणूक लागली की फक्त पुढारी आश्वासने देण्यासाठी येतात एकदा निवडणूक झाली की आमच्या मागण्याकडे कोणी लक्ष देत नाही असा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनावर गोपाळ चव्हाण, गुलाब राठोड, मोतीराम चव्हाण, संजय राठोड, सुरेश चव्हाण, तुकाराम राठोड, भीमराव चव्हाण, गोपाळ राठोड, गोविंद राठोड, गणपत चव्हाण, सईन जाधव, फुलचंद चव्हाण संतोष चव्हाण लक्ष्मण चव्हाण सह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांना निवेदन...

शासन येथील ग्रामस्थांच्या मागणीकडे लक्ष देतील का हे आता पहावे लागणार आहे.



## उमरग्यात मतदान केंद्र मतदारांच्या दारी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ मे -**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्वांनी मतदान करावे. कोणीही कोणत्याही कारणाने मतदानापासून वंचित राहू नये. यासाठी निवडणूक विभाग सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. याचाच एक भाग म्हणून दिव्यांग मतदार आणि वयाच्या पंच्याऐंशी वर्षावरील मतदारांना मतदान केंद्रापर्यंत येण्याचा त्रास होऊ नये म्हणून मतदान केंद्रच अशा मतदारांच्या घरी जाण्याचा उपक्रम सर्वत्र राबविला जात आहे.

तालुक्यातील दाबका या गावामध्येही दिव्यांग आणि पंचाऐंशी वर्षापुढील मतदारांच्या घरी जाउन मतदान करून घेण्यात आले.याप्रसंगी क्षेत्रीय अधिकारी एम.टी. माकणीकर, बीएलओ. एस.आर. वैरागकर, केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी उपस्थित होते.

## एअरबीएनबी ने आणली आयकॉन्स नावाची योजना

मुंबई – आज एअर बीएनबीने आयकॉन्स नावाची योजना जाहीर केली आहे. यात संगीत, चित्रपट, टेलिव्हिजन, कला, क्रीडा आणि यासारख्या अनेक क्षेत्रातील लोकांच्या घरात रहायला मिळणार आहे. हे आयकॉन्स तुम्ही आतापर्यंत फक्त कल्पना केली असेल अशा त्यांच्या विश्वात तुम्हाला घेऊन जाणार आहेत. आता तुम्ही फेरारी म्युझियम मध्ये झोपू शकता, एखाद्या राजकुमाराच्या पर्पल रेन हाऊसमध्ये राहू शकता, आणि बॉलिवूड आयकॉन जान्हवी कपूरच्या समुद्रकिनारी वसलेल्या घरात एक दिवस व्यतित करू शकता. एअरबीएनबीवर आज आम्ही असे पहिले ११ आयकॉन आणणार आहोत. त्यामुळे या वर्षात जगभर असे अनेक अनुभव तुम्हाला घेता येतील.

## एनडीटीव्ही मराठी नव्या महाराष्ट्राचा निर्मितीच्या व्हिजनमध्ये

सत्य, अचूकता आणि परिणामकारकता यासाठी ओळखल जाणारा एनडीटीव्ही चा प्रतिष्ठित आवाज, आता मराठीपर्यंत येऊन पोहोचला आहे. १ मे महाराष्ट्रदिनी मुंबईतल्या ताज लँड्स एन्डमध्ये पार पडलेल्या शानदार कार्यक्रमात एनडीटीव्ही मराठी या चॅनेलचे लोकार्पण करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या वाहिनीचे लोकार्पण झाले. या भव्य कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य प्रफुल पटेल, मिलिंद देवरा, राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार, शिवसेना नेते सचिन अहिर, अभिनेत्री अमृता खानविलकर, श्रिया पिळगावकर, अभिनेता शरद केळकर, दिग्दर्शक मधुर भांडारकर, असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

## न्यू स्विफ्ट साठी सुरु केली प्री-बुकिंग

नवी दिल्ली,: देशातील आघाडीची कार निर्माता कंपनी असलेल्या मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडने अत्यंत अपेक्षीत ४थ्या पिढीतील एपिक न्यू स्विफ्टचे प्री-बुकिंग रु. ११,०००/- मध्ये सुरु केले आहे. या ऑल-न्यू जनरेशन मध्ये, एपिक न्यू स्विफ्ट आपल्या अत्यंत आवडत्या सिग्नेचर स्पोर्टी डिझाईनवर तयार करण्यात आली आहे आणि त्याची गतिशीलता आणि फन-टू-ड्राइव्ह गुणांक वाढवते.

## ॲमेझॉन इंडियाकडून आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम

मुंबई – ॲमेझॉन इंडियाने आज ट्रक ड्रायव्हर्ससाठी सर्वसमावेशक आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम 'सुश्रुत'च्या लाँचची घोषणा केली. ॲमेझॉन ३५० हून अधिक ट्रकिंग सहयोगींसोबत काम करते, जे हजारो ट्रक ड्रायव्हर्सना काम देतात. या उपक्रमाचा रस्त्यावर बहुतांश वेळ ड्रायव्हिंग करत काम करणाऱ्या या ट्रक ड्रायव्हर्सच्या आरोग्यविषयक गरजांना प्राधान्य देण्याचा मनसुबा आहे. तसेच, हा उपक्रम दीर्घकालीन आरोग्य पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करेल, ज्याचा ट्रक ड्रायव्हर्स आणि त्यांच्या कुटुंबियांना फायदा होईल. बेंगळुरू, मानेसर (हरियाणा) आणि देशांच्या इतर भागांमध्ये ट्रक ड्रायव्हर्ससाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये ७० हून अधिक आरोग्यविषयक घटकांची तपासणी करण्यात येणार आहे.

## थंड तेलाचा राजा नवरत्न तेल

कोलकाता: इमामी लिमिटेडच्या आयुर्वेदिक कूल ऑइल मार्केट मध्ये अग्रगण्य असलेले नवरत्न तेल या उन्हाळ्यात एक लाफ्टर चॅलेंज घेऊन आले आहेत, ज्यामध्ये कपिल शर्मा त्याच्या लाफ्टर कुटुंबातील मेंबर किकू शारदा, गौरव गेरा आणि सुमोना चक्रवर्ती यांच्यासह ब्रँडमध्ये सामील झाले आहेत.नवीन टीव्ही जाहिराती आणि डिजिटल कंटेंटमध्ये, नवरत्न तेलने कपिल शर्मा आणि त्याच्या साथीदारांसह एक मस्त कॉमिक सादर केला आहे. नवरत्न तेल थंडक का बादशाह, राहत का राजा म्हणून सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या दैनंदिन ताणतणाव आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी मदत करते. नवरत्न तेलाचा दोन मिनिटांचा चंपी (डोक्याचा मसाज) आराम आणि विश्रांती देते आणि थंड थंडा कूल कूल करते.

## ट्रक ड्रायव्हर्ससाठी 'सुश्रुत' लाँच

छत्रपती संभाजीनगर – ॲमेझॉन इंडियाने आज ट्रक ड्रायव्हर्ससाठी सर्वसमावेशक आरोग्य व स्वास्थ्य उपक्रम 'सुश्रुत'च्या लाँचची घोषणा केली. ॲमेझॉन ३५० हून अधिक ट्रकिंग सहयोगींसोबत काम करते, जे हजारो ट्रक ड्रायव्हर्सना काम देतात. या उपक्रमाचा रस्त्यावर बहुतांश वेळ ड्रायव्हिंग करत काम करणाऱ्या या ट्रक ड्रायव्हर्सच्या आरोग्यविषयक गरजांना प्राधान्य देण्याचा मनसुबा आहे. तसेच, हा उपक्रम दीर्घकालीन आरोग्य पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करेल, ज्याचा ट्रक ड्रायव्हर्स आणि त्यांच्या कुटुंबियांना फायदा होईल. बेंगळुरू, मानेसर (हरियाणा) आणि देशांच्या इतर भागांमध्ये ट्रक ड्रायव्हर्ससाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये ७० हून अधिक आरोग्यविषयक घटकांची तपासणी करण्यात येणार आहे.

## गायनोवेदा तर्फे फर्टिलिटी क्लीनिक ची सुरुवात

नाशिक – फर्टिलिटीसाठी आयुर्वेद, तंत्रज्ञान, सामग्री आणि समुदाय यांचे अनोखे मिश्रण असलेली भारतातील पहिली आयुर्वेद फर्टिलिटी कंपनी गायनोवेदा यांनी पुण्यात त्यांचे दुसरे फर्टिलिटी क्लिनिक सुरु केले आहे. १० दशलक्ष जोडप्यांचे पालकत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यात मदत करून त्यांच्या जीवनावर प्रभाव टाकण्याचा कंपनीचा मानस आहे. अनेक जोडप्यांना पालकत्व प्रदान करण्याचे त्यांचे ध्येय पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे पुण्यातील क्लीनिक एक महत्वाचे पाऊल आहे. गायनोवेदा एक अग्रगण्य प्रजनन समाधान प्रदाता आहे जो आयुर्वेदासह नैसर्गिक गर्भधारणा सक्षम करतो. हे जोडप्यांची सुरक्षितता, परिणामकारकता आणि सर्वांगीण कल्याण यावर लक्ष केंद्रित करते.त्याचे उपचार १००% नैसर्गिक आहेत, हानिकारक दुष्परिणाम टाळतात आणि आयुर्वेदावर अवलंबून असतात, प्रजनन आरोग्यासाठी एक नैसर्गिक वैदिक औषध देण्याचे कार्य गायनोवेदा करत आहे. हा सुरक्षित, गैर-आक्रमक पर्याय व्यक्तींना त्यांच्या आरोग्याशी तडजोड न करता प्रभावी उपचार घेण्यास सक्षम बनवतो, ज्यामुळे प्रजनन उद्योगात गायनोवेदा हा एक मौल्यवान पर्याय बनतो. मासिक पाळी आणि पुनरुत्पादक आरोग्य विकारांसाठी भारतातील ६००००० हून अधिक महिलांचा गायनोवेदा वर विश्वास आहे.

## 'नाच गं घुमा'ने पुण्यात मिरज सिनेमाने खळबळ उडवून दिली: कलाकार आणि क्रूसह उत्तम प्रदर्शन

पुणे : मिरज सिनेमाज, भारतातील तिसरी सर्वात मोठी आणि वेगाने वाढणारी मल्टिप्लेक्स साखळी, ३ मे २०२४ रोजी पुण्यातील नव्याने नूतनीकरण केलेल्या मिरज स्पाइन सिटी मॉलमध्ये नाच गं घुमा या बहुप्रतिक्षित मराठी चित्रपटासाठी खास कलाकारांचे अनावरण केले. आणि क्रू स्क्रीनिंग आयोजित केले. जोश पच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला हा रेड कार्पेट कार्यक्रम केवळ चित्रपट प्रदर्शनापेक्षा अधिक होता; यात मिराज सिनेमाची मराठी संस्कृती, प्रादेशिक सिनेमा आणि स्थानिक कलागुणांशी असलेली सखोल बांधिलकी दिसून आली. अत्याधुनिक व्ह्यूइंग टेक्नॉलॉजी, आरामदायी आसन व्यवस्था आणि प्रीमियम फूड आणि बेव्हरेज पर्यायांसह सिनेमाचा अनुभव वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. चित्रपटाचे कलाकार, क्रू आणि सन्मानित पाहुण्यांसाठी एक संस्मरणीय अनुभव निर्माण करण्यासाठी स्क्रीनिंगची रचना करण्यात आली होती, ज्यामुळे त्यांना आकर्षक आणि इमर्सिव्ह सिनेमॅटिक अनुभव प्रदान करण्यात आला होता.

## अमेज़न च्या उन्हाळी विक्रीमध्ये आईकू च्या विशेष सवलतीसह मोठी बचत करा.

नवी दिल्ली – उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू २ मे ते ७ मे २०२४ पर्यंत सुरू होणाऱ्या अमेज़न समर सेल इव्हेंट दरम्यान आईकू ११, आईकू जेड ९, आईकू जेड ७ प्रो , आणिआईकू नियो ९ प्रो सारख्या लोकप्रिय स्मार्टफोन्सवर आकर्षक डील देत आहे. आईकू जेड ९ वर ग्राहकांना २,००० रुपयांची झटपट बँक सवलत आणि रु. १,००० एक्सचेंज बोनस तसेच ५९९ रुपयांचे मोफत विवो इयरफोन मिळू शकतात. तसेच, आईकू नियो ९ प्रोच्या खरेदीवर रु. २,००० इन्स्टंट बँक सवलत आणि रु. २,००० एक्सचेंज बोनस मिळू शकतात. अतुलनीय कामगिरी, स्लीक डिझाइन आणि फ्लॅगशिप लेव्हल कॅमेऱ्यांसह, आईकू स्मार्टफोन तंत्रज्ञान प्रेमींसाठी एक तल्लीन अनुभवाची हमी देतात.

# ती नवविवाहिता जिवंत होती, नातेवाईकांच्या दाव्याने खळबळ



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०५ एप्रिल – उंबरखेड येथील नवविवाहिता पूजा राहुल अंभोरे वय १८ वर्ष ही आपल्या सासरी सकाळी अचानक चक्कर येऊन बेशुद्धावस्थेत पडली तिला तत्काळ पतीने नागापूर येथील रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेला व तिथून कन्नड ग्रामीन रुग्णालयात सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास दाखल केले असता कर्तव्यावर असलेल्या वैद्यकीय अधिकारी मनीषा गीते यांनी साडे नऊ वाजेच्या सुमारास इसीजी व अन्य पद्धतीने तपासुन मृत घोषित केले,यावेळी नातेवाईकांनी हंबरडा फोडला,पण त्याच वेळी सोबत असलेल्या महिलेने सांगितले की पुजाचे हृदयाचे ठोके जाणवत आहेत, असे सांगताच पती,सासरे,आई वडील यांनी तिला तत्काळ उचलून खाजगी वाहनात टाकले,यावेळी पूजाने डोळे उघडले असे नातेवाईक, प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आणि पूजा जिवंत असल्याचे सांगितले,

पूजा हिस लोणी,प्रवरासंगम येथील डॉ. विखे पाटील रुग्णालय येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले,यावेळी नातेवाईकांनी आरोप केला आहे की आमची मुलगी जिवंत होती पण केवळ डॉक्टरच्या हलगर्जीपणामूळे पुजास योग्य उपचार न मिळाल्याने ती दगावली,असा आरोप नातेवाईकांनी केला आहे,रस्त्याने पूजाला घेऊन जात असताना तिने पाणी प्राशन केले असे नातेवाईकांनी सांगितले,पूजा कुठे दगावली,कशी दगावली हे गूढ मात्र कायम आहे.

**पूजा हिस रुग्णालयात दाखल केले असता प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या, ईसीजी, सह अन्य तपासण्या करून अर्ध्या तासाने मृत घोषित करण्यात आले, ज्यावेळेस नातेवाईकांना सांगितले तेव्हा त्यांनी रूग्णाला उचलुन घेऊन गेले.**

**प्रवीण पवार – प्रभारी वैद्यकीय अधीक्षक**

**माझ्या पत्नीला योग्य उपचार मिळाले नाही त्यामुळे ती दगावली आहे,माझी पत्नी जिवंत असताना तिला मृत घोषित केले,जर त्यावेळेस योग्य उपचार झाले असते तर ती आज जिवंत असती,**

**राहुल अंभोरे मयताचा पती**

# गोवंश हत्या प्रकरणी खाटकांवर पोलिसांची दुसऱ्यांदा कारवाई

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०४ :- नेहरू चौक परिसरातील खाटीकवाडा भागात गोवंश हत्या प्रकरणी पोलिसांनी पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा कारवाई केली असून तीन क्लिंटन गोमांसासह एक वासरू पैठण पोलिसांनी जप्त करून तीन खाटकांवर गोवंश हत्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर यातील काही आरोपी हे फरार झाले आहेत.

दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी भल्या पहाटे ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने नेहरूचौक भागातील खाटीकवाडा भागात तीन क्लिंटन गो मांसासह २१० कत्तल केलेल्या गायींचे अवशेष जप्त करून पाच खाटकांवर गुन्हा दाखल केला होता. परंतु कारवाईला १५ दिवस उलटत नाही तोच त्याच ठिकाणावर पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या पथकाने दिनांक ४ मे शनिवारच्या पहाटे कारवाई करत तीन क्लिंटन गोवंशमांसासह एक वासरू ताब्यात घेऊन वसीम मेहबूब कुरेशी



वय ३१ रा. कुरेशी मोहल्ला पैठण, शहबाज शरीफ कुरेशी वय २५ रा. सादत मोहल्ला पैठण, शाहरुख मुस्ताक कुरेशी वय ३० रा. गाजीपुरा पैठण या खाटकांच्या मुसक्या आवळल्या आहेत.आरोपींवर ४२९,३४भा दवी सह कलम ५ (क)( ड )९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम१९७६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाईत निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार महेश माळी,बिट जमादार अनिकेत वैद,पो कॉ अनिल गायकवाड यांनी सहभाग घेतला.जप्त केलेल्या गोवंश मांसाची गड्डा खोदून विल्हेवाट लावण्यात आली.

**पोलीस कारवाईची भीती न बाळगून पुन्हा गो वंश हत्या करून मांस विक्री करणाऱ्या मुजोर खाटकांवर तडीपारीची कारवाई करावी अशी मागणी हिंदुत्ववादी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. प्रचंड प्रमाणात गोवंश मांस हस्तगत करण्याच्या कारवाई या हिंदूसाठी पवित्र असलेल्या कामदा एकादशी व वरूनतिथी एकादशीला झाल्याने सामाजिक वातावरण दूषित करू पाहणाऱ्या खाटकांवर जिल्हा बंदीची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

## शाळा चांगली सांभाळा व पुढे घेऊन जा- रामभाऊ सहज



त.भा.वृत्तसेवा/ता.प्र.

गराडा : दि.०१ मे रोजी कै.गुरुदयालसिंग राठोड प्राथमिक आश्रमशाळेचे वस्तीगृह विभागाचे कर्मचारी रामभाऊ सहज यांच्या सेवापूर्ती निमित्त शाळेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाकडून त्यांचा सेवागौरव करण्यात आला या प्रसंगी बोलताना रामभाऊ सहज यांनी सांगितले की, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. इंदरचंद राठोड यांनी आमच्यावर विश्वास टाकला ब तो मी गेल्या तीस वर्षापासून सार्थ ठरवला. साहेबांच्या इच्छेनुसार आपण शाळा चांगली सांभाळा पुढे घेऊन जा असे आवाहन त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना केले.

यावेळी संस्थेचे सचिव प्रविण राठोड व सहशिक्षीका माया पवार यांच्या हस्ते रामभाऊ यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक ताराचंद राठोड , सहशिक्षक हेमंत शिंपी ,प्रा.अशोक दुधकर यांनी रामभाऊ यांनी संस्थेच्या, शाळेच्या प्रतिकुल परिस्थितीत सेवाव्रती प्रमाणे शाळेची, मुलांची सेवा केली या विषयी माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोप करताना माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर मांडे यांनी आम्ही साहेबांच्या व आपल्या इच्छेनुसार शाळा चांगली सांभाळू व पुढे घेऊन जाऊ असे आश्वासन सर्वांच्या वतीने दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा अशोक दुधकर यांनी केले.

## अप्सरा १० मे पासून



छत्रपती संभाजीनगर – प्रेम, राजकारण, ॲक्शन आणि सुरेल संगीताची मेजवानी अप्सरा या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळणार आहे. चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला असून, अप्सरा हा चित्रपट येत्या १० मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सुनील भालेराव यांच्या 'श्रमण फिल्म्स' या निर्मिती संस्थेतर्फे अप्सरा चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून, त्यांची ही पहिलीच निर्मिती आहे. चंद्रकांत पवार यांनी या चित्रपटाची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटातील तीनही गाण्यांचं लेखन आणि संगीत दिग्दर्शन मंगेश यांनी केले असून या चित्रपटाच्या निमित्ताने त्यांनी संगीत दिग्दर्शक म्हणून पदार्पण केले आहे. गायक अभय जोधपूरकर गायिका आनंदी जोशी, ओंकार स्वरुप, भैय्या मोरे, मेघा मुसळे यांच्या आवाजात चित्रपटातील गीते स्वरबद्ध करण्यात आली . अभिनेता सुयश झुंजुरके, अभिनेत्री मयूरी आव्हाड, अक्षता पाडगावकर, अभिनेत्री मेघा घाडगे, शशांक शेंडे, विठ्ठल काळे, मयूर पवार, खान्देशरत्न सचिन कुमावत,विजय निकम, राजेश भोसले, आशिष वारंग,समीक्षा भालेराव, प्रज्ञा त्रिभुवन,संघर्ष भालेराव अशी कलाकार या चित्रपटात आहे. राजा फडतरे यांनी छायांकन, निलेश राठोड यांनी संकलन, तर सुबोध आरेकर, इमरान मालगुणकर, कृतिक माझिरे यांनी नृत्यदिग्दर्शन केलं आहे.

## अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची खर्चाची प्रथम तपासणी संपन्न

अहमदनगर दि. ४ मे (जि.मा.का.) ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांची निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे खर्च निरीक्षक शक्ती सिंग यांच्या उपस्थितीत दि.०३ मे रोजी पार पडली. या तपासणीस २५ उमेदवारांपैकी २१ उमेदवार/प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच उमाशंकर श्यामबाबू यादव, अमोल विलास पाचुंदकर, रावसाहेब शंकर काळे व दिलीप कोंडीबा खेडकर हे ४ उमेदवार अनुपस्थित असल्यामुळे त्यांना मा.भारत निवडणूक आयोग यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याद्वारे नोटीस देण्यात आलेली आहे.

निरीक्षक शक्ती सिंग यांनी स्वतः सर्व उमेदवारांच्या खर्चाच्या नोंदवह्याची तपासणी केली. प्रथम तपासणीनंतर उमेदवारांच्या खर्चाचे दैनंदिन नोंदवही मा. निवडणूक आयोग यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार आहे. दुसरी तपासणी ७ मे रोजी पार पडणार आहे. या तपासणीसाठी सर्व उमेदवारांनी त्यांच्या खर्च नोंदवही व इतर अनुषंगिक कागदपत्रे यासह उपस्थित राहावे, असे आवाहन खर्च निरीक्षक शक्ती सिंग यांनी केले आहे.

प्रथम तपासणी साठी नोडल अधिकारी ( खर्च) शैलेश मोरे, सहाय्यक खर्च निरीक्षक अजय कुमार, सहाय्यक समन्वय अधिकारी (खर्च)विशाल पवार,भाग्यश्री जाधव,राजू लाकूडझोडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जय जय शनिदेव मालिकेच्या कलाकारांनी घेतले शनी शिंगणापूर येथे शनिदेवाचे दर्शन

छत्रपती संभाजीनगर : सोनी मराठी वाहिनी प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी नेहमी नवनवीन कार्यक्रम घेऊन येत असते. आजवर पौराणिक, ऐतिहासिक, थरारक, इत्यादी मालिका सोनी मराठी वाहिनीवर पाहायला मिळाल्या आहेत. त्यातच आता सोनी मराठी वाहिनीने नवी मालिका घोषित केली आहे. 'जय जय शनिदेव' असे या मालिकेचे नाव आहे. जीवनात सुख, शांतता आणि समाधान देणारी न्यायाची देवता 'शनिदेव' यांच्यावर आधारित ही नवी मालिका असणार आहे. मालिकेच्या प्रदर्शनापूर्वी मालिकेच्या कलाकारांनी आणि निर्मात्यांनी शनी शिंगणापूर येथे जाऊन दर्शन घेतले. निर्माते आणि लेखक संतोष अयाचित आणि शनिदेवांच्या भूमिकेत असलेले संकेत खेडकर हे सहभागी झाले. यांनी शनी शिंगणापूर येथे दर्शन घेतले आणि मालिकेनिमित्त छोटेसे हवन देखील केले.

## सार्वजनिक ऑफर ६ मे रोजी होईल सुरु

छत्रपती संभाजीनगर- इंडिजीन लिमिटेडने (द कंपनी) त्याची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (ऑफर) आणली असून, त्यासाठी बिड/ऑफर सोमवार, ६ मे, २०२४ सुरू होईल. तर शेवटची तारीख बुधवार, ८ मे २०२४ असेल. अँकर गुंतवणूकदाराची बिडिंग तारीख ही बोली/ऑफर उघडण्याच्या तारखेच्या एक कामकाजाचा दिवस आहे, तो म्हणजेच शुक्रवार, ३ मे, २०२४. ऑफरचा प्राइस बँड निश्चित करण्यात आला आहे. तो ४३० ते४५२ प्रति इक्विटी शेअर असा आहे. किमान ३३ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३३ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल.

# सोयगाव येथील कवी माणिक सोनवणे यांच्या कवितेची राज्यस्तरीय काव्यस्पर्धेतून प्रथम क्रमांकाची निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ मे

शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान पिंपळगाव जलाल ता.येवला जि.नाशिक शहादू शिवाजी वाघ यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान यांच्याद्वारे राज्यभरातील साहित्यिकांना २० जानेवारी २०२४ पर्यंत आप आपले साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.व विजयत्यांना प्रथम,दृतीय, तृतीय,आणि उत्तजनार्थ असे पुरस्कार जाहीर केलेले होते.

त्यामुळे महाराष्ट्रातून साहित्य कलाकृती पुरकरसाठी साहित्यिकांनी ४७ कविता संग्रह,१७ कथा,५ कादंबऱ्या, आणि ११ ललितलेख संग्रह असे एकूण ८० साहित्यकृतींनी सहभाग नोंदविलेला होता.तर काव्य लेखन स्पर्धेत महाराष्ट्रा मधून २४२ साहित्यिकांनी आप आपल्या उत्कृष्ट कविता



प्रतिष्ठानास स्पर्धेसाठी पाठवलेल्या होत्या.स्पर्धेतल्या कवितांना न्याय मिळावा म्हणून कवितेला कवीचे नाव न देता सांकेतिक क्रमांक देऊन आयोजकांनी परीक्षकाकडे परीक्षणासाठी पाठविण्यात आलेल्या होत्या.

ह्या काव्यस्पर्धेचे परीक्षण प्रा.मंगल सांगळे बारागाव पिंप्री ता. सिन्नर, जि नाशिक यांनी केले.तर ह्या काव्यलेखन स्पर्धेचा निकाल १ मे २०२४ महाराष्ट्रदिन दिवसाच्या निमित्ताने जाहीर करण्यात आला. ह्या २४२ स्पर्धक कवींच्या कविते मधून कवी माणिक सोनवणे यांच्या धूळपेरणी (कोरडे नक्षत्र) कवितेची प्रथम क्रमांकानी निवड तज्ञ परिक्षकाकडून करण्यात आली आहे. ४ जून २०२४ रोजी सकाळी १० वा. साई सृष्टी लॉन्स कोपरगाव शिर्डी जि.अहमदनगर या ठिकाणी भव्य साहित्यिकांच्या सोहळ्यात कवी माणिक सोनवणे यांच्या धूळ पेरणी कवितेला प्रथम क्रमाकांचा पुरस्कार देऊन सन्मानित करणार असल्याचे निमंत्रणपत्र पाठवून आमंत्रीत केलेले आहेत.करीता प्रतिष्ठान व साहित्यिक वर्गाच्या स्तरावरुन शुभेच्छा मिळत आहे.

## गावठी हातभट्टी वर छापा मारुन रसायन जप्त

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ४ फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वाघूर नदी पात्रात पोलिसांनी गावठी हातभट्टीवर छापा टाकत ७८५०० रुपयांचे रसायन जप्त करण्यात आले असून दोन आरोपी ताब्यात घेण्यात आले.ही कार्यवाही शुक्रवार दि.३ रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,पोउनि सुग्रीव चाटे,प्रकाश कोळी,प्रदीप बेदरकर,ठाकरे यांच्या पथकाने शुक्रवार दि.३ रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास वाघूर नदीच्या पात्रात सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर छापा टाकून एकूण ७८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate** : **PANKAJA GOPINATHRAO MUNDE**

**Name of political party** : **Bharatiya Janata Party**

**Name of Election** : **House of People (Lok Sabha Election - 2024)**

***Name of Constituency** : **39 - Beed Parliamentary Constituency**

**I Pankaja Gopinathrao Munde,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A)**

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
| 1. | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C. Pimpri | S.C.C. No. 3574/2023 (F.N. 6635/2023) Dtd. 05-12-2023 | Unready Board | Section 188, 279 Of Indian Penal Code and under section 51-B of Disaster Management Act and Section-3 of Epidemic Diseases Act Violation of Disaster Management Act and Epidemic Diseases Act. |
| 2. | Jt. C.J.J.D. and J.M.F.C. Patoda | S.C.C. No. 185/2022 (F.N. 1366/2022) Dtd. 05-09-2022 | Argument on Exhibited-unready | Section 188, 269, 270 of Indian Penal Code and under Section 51-Disaster Management Act Violation of Disaster Management Act. |

**(B)**

| Sl. No. | Details about cases of conviction for criminal offences | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court and date(s) of order(s) | Case No. And dated | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
| 1. | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

Name & Signature of Candidate

**(Pankaja Gopinathrao Munde)**

## अग्रलेख...

# काँग्रेस पक्षाचा घोळात घोळ

देशभरात गेल्या १० वर्षांपासून काँग्रेस पक्षाची वाताहत सुरू आहे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे पानिपत झाले. यावेळच्या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेस पक्षाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. तरीपण काँग्रेस पक्षाला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. काँग्रेस पक्षाने अखेर अमेठी आणि रायबरेलीतील आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करताना घोळ घातला. अमेठीतून किशोरीलाल शर्मा यांना तर रायबरेलीतून राहुल गांधी यांना उमेदवारी दिली. काँग्रेस पक्षाचा हा निर्णय म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखा आहे. यात काहीच नवे नाही. काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यावेळी लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट झाले आणि राहुल गांधी अमेठी सोडून आपल्या आईच्या म्हणजे सोनिया गांधींच्या रायबरेली मतदारसंघात गेले. काँग्रेस पक्षाने या दोन जागांवरचे आपले उमेदवार घोषित करायला आपल्या नेहमीच्या सवयीनुसार नाटकं केली. काँग्रेस पक्षाला जणू आपला पंतप्रधानपदाचा उमेदवार तसेच पूर्ण मंत्रिमंडळ ठरवायचे होते, एवढा वेळ त्यांनी अमेठी आणि रायबरेलीचा उमेदवार निश्चित करण्यासाठी घेतला. असे करून काँग्रेस पक्षाने स्वतःचे नुकसान करून घेतले आहे. अमेठीतून किशोरीलाल शर्मा यांची उमेदवारी पुरेशा आधी जाहीर केली असती तर त्यांना प्रचार करायला पुरेसा वेळ मिळाला असता. आपल्याला निवडणूक लढवायची आहे की नाही, हे प्रियांका वढेरा यांनी आधीच जाहीर करायला पाहिजे होते. तसेच आपण अमेठीतून नाही तर यावेळी रायबरेलीतून निवडणूक लढणार, हे राहुल गांधींनीही आधीच सांगायला हवे होते. भाजपाने आपल्या पहिल्या यादीत केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांची अमेठीतून उमेदवारी जाहीर केली. गेल्या महिनाभरापासून त्या अमेठीत तळ ठोकून आहेत. त्यांच्या पूर्ण मतदारसंघातील प्रचाराच्या दोन-तीन फेऱ्याही पूर्ण झाल्या आणि काँग्रेस पक्ष कोणाला उमेदवारी द्यायची याचेच चर्वितचर्वण करीत राहिला.

आता स्मृती इराणी यांना अमेठीत काँग्रेसचे किशोरीलाल शर्मा यांच्याशी लढायचे आहे. मागील निवडणुकीत अमेठीत राहुल गांधी यांचा स्मृती इराणी यांच्यासमोर टिकाव लागला नाही तर यावेळी किशोरीलाल शर्मा कोण? त्यामुळे अमेठीची निवडणूक यावेळी इराणी यांनी आता न लढताच जिंकली आहे. कारण, अमेठी सोडून राहुल गांधी तसेच काँग्रेस पक्षाने आपला पराभव मान्य केला आहे. अमेठीतून प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा यांनी निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. म्हणजे जो निवडणूक लढायची तयारी दाखवतो, त्याला काँग्रेस पक्ष उमेदवारी देत नाही आणि जे निवडणूक लढवायला तयार नाही, त्यांना निवडणूक लढवायची जबरदस्ती करतो.

कधीकाळी उत्तरप्रदेशात काँग्रेसची सत्ता होती, हे आता कोणाला सांगितले तर त्याचा त्यावर विश्वास बसणार नाही, एवढी त्या राज्यात काँग्रेसची दयनीय स्थिती आहे. उत्तरप्रदेशात सर्वाधिक म्हणजे लोकसभेच्या ८० जागा आहेत. विशेष म्हणजे त्यावेळी काँग्रेस पक्ष उत्तरप्रदेशातील लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढवायचा आणि जिंकायचा. पण आता त्या राज्यात काँग्रेस शोधावी लागत आहे. २०१४ मध्ये काँग्रेस राज्यातील अमेठी आणि रायबरेली अशा दोनच जागा जिंकू शकला होता. २०१९ मध्ये तर काँग्रेसला फक्त रायबरेलीची एकमेव जागा जिंकता आली. अमेठीत केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी राहुल गांधी यांचा पराभव केला होता.

अमेठी आणि रायबरेली हे काँग्रेस पक्षाचे विशेषत: गांधी घराण्याचे गड मानले जात होते. पण या गडाला अमेठीच्या रूपात पहिला हादरा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बसला. मागील वेळी राहुल गांधी यांनी अमेठीसोबत केरळच्या वायनाडमधूनही निवडणूक लढवल्यामुळे तसेच तेथे ते जिंकल्यामुळे त्यांची आणि काँग्रेस पक्षाचीही ठाकूरकी राहिली. यावेळी सोनिया गांधी यांनी प्रकृतीच्या कारणावरून रायबरेलीतून लोकसभा निवडणूक लढण्यास नकार दिला आणि मागल्या दाराने म्हणजे राजस्थानातून त्या राज्यसभेत पोहोचल्या. त्यामुळे काँग्रेसची पाचावर धारण बसणे स्वाभाविक होते. अमेठीत मागील वेळी राहुल गांधी यांचा पराभव झाल्यामुळे यावेळी ते तेथून निवडणूक लढण्यास फार उत्सुक नव्हते आणि सोनिया गांधींनी तर लोकसभा निवडणूक लढण्यासच नकार दिला. त्यामुळे या दोन मतदारसंघांतून कोणाला उभे करावे, उमेदवारी द्यावी, असे गहन प्रश्न काँग्रेसला पडणे स्वाभाविक होते. रायबरेलीतून प्रियांका वढेरा निवडणूक लढवतील, अशी चर्चा होती. पण त्यांचीही लोकसभा निवडणूक लढवण्याची हिंमत झाली नाही. त्यांनीही निवडणुकीच्या मैदानातून पळ काढला. प्रियांका गांधी आताआतापर्यंत काँग्रेस महासचिव म्हणून उत्तरप्रदेशच्या प्रभारी होत्या. २०२२ ची राज्यातील विधानसभा निवडणूक काँग्रेसने त्यांच्या नेतृत्वात लढवली होती. ४०३ सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेसला फक्त दोन जागा जिंकता आल्या. म्हणजे उत्तरप्रदेशातून लोकसभेत एक आणि विधानसभेत दोन अशी काँग्रेसची कामगिरी होती. त्यामुळे यावेळच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस काय दिवे लावणार, हे दिसतच होते. विधानसभा निवडणुकीत 'लडकी हूं लढ सकती हूं...' म्हणत महिलांमध्ये जोश निर्माण करणाऱ्या प्रियांका वढेरा यांची मात्र यावेळी निवडणूक लढण्याची हिंमतच झाली नाही. आपल्या पराभवाची चाहुल लागल्यामुळे प्रियांका वढेरा यांनी रायबरेलीतून लोकसभा निवडणूक लढण्यास नकार दिला असू शकतो.

राहुल गांधी यांचीही यावेळी पुन्हा अमेठीतून लोकसभा निवडणूक लढण्याची हिंमत झाली नाही. एखादा लहान मुलगा आपल्या आईच्या पदरामागे लपतो, तसेच राहुल गांधींनी आपल्या आईच्या रायबरेली मतदारसंघाची निवड करत आईचा पदर पकडला आहे. यावेळची लोकसभा निवडणूक फोकनाड राहुल गांधी वायनाड आणि रायबरेलीत मतदारसंघातून लढवत आहे. वायनाडमधील मतदान आटोपले असून अमेठीत २० मे ला मतदान होत आहे. खरं म्हणजे कोणत्याही नेत्याने दोन मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवावी का, असा मोठा प्रश्न आहे. राहुल गांधी वायनाड आणि रायबरेली अशा दोन्ही मतदारसंघांतून जिंकले तर त्यांना एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागेल. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिलेल्या मतदारसंघात आयोगाला पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागेल. या पोटनिवडणुकीचा भुर्दंड सामान्य जनतेवर का पडू द्यायचा? समजा राहुल गांधी दोन्ही मतदारसंघात हरले तर प्रश्नच नाही. पण दोनपैकी एका मतदारसंघात ते पराभूत झाले तर फारसा फरक पडणार नाही; पोटनिवडणूक घेण्याची वेळ येणार नाही. मात्र, दोन्ही मतदारसंघांत ते जिंकले, ज्याची दूरदूरपर्यंत शक्यता नाही, तर एका मतदारसंघातील पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. वायनाडमधील मतदान आटोपले आहे. तेथील मतदारांनी काय निर्णय घेतला, हे ४ जूनला मतमोजणीनंतर समजणार आहे. त्यामुळे रायबरेलीच्या मतदारांनी तरी निवडणूक आयोगावर पोटनिवडणूक घेण्याची वेळ येणार नाही, याची काळजी घ्यायला हरकत नाही. अमेठीच्या मतदारांनी आपली राजकीय समज आणि शहाणपणा २०१९ च्या निवडणुकीत दाखवला होता; आता वेळ रायबरेलीच्या मतदारांची आहे. त्यांना आता आपली राजकीय समज आणि शहाणपण दाखवायचा आहे. अमेठी आणि रायबरेलीत उमेदवारी अर्ज भरण्याला काही तास उरले असताना काँग्रेसने आपल्या उमेदवारांची घोषणा करीत आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचे तसेच पराभूत मानसिकतेचे दर्शन देशाला घडवले आहे. काँग्रेस पक्षाकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा तरी आपण काय करू शकतो... ▮


## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# 'व्होट जिहाद'ला मुस्लिम मतदार बळी पडतील?

भारतीय जनता पक्षाने सत्तेत येऊन १० वर्षे पूर्ण केली आहेत. या १० वर्षांत भारतात आमूलाग्र बदल झाला. पूर्वी हिंदू-मुस्लिम अशा दोन भागांत भारतीय भावविश्वाची विभागणी केली जायची; पण मोदींनी एकात्मतेची हाक दिली. अयोध्येत राम मंदिरात बालकरामाची प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा मुसलमान समाजाकडूनही शुभेच्छा आल्या. स्वयंघोषित पुरोगाम्यांना मात्र या गोष्टीचा खूपच त्रास झाला. काश्मीरमधून ३७० हटवले तेव्हा दंगली घडतील, अतिरेकी हल्ला होईल, अशी भीती पुरोगामी विश्वाने दाखवली होती. मात्र, तुम्ही जेव्हा राजधर्म पाळता तेव्हा तुम्ही परिस्थिती व्यवस्थित हाताळू शकता, हे मोदींनी दाखवून दिले. नरेंद्र मोदींनी गुजरात दंगल व्यवस्थित हाताळली होती. म्हणूनच त्यांच्याकडे सुशासन, प्रशासन आणि विकास या सर्व गोष्टींचा अनुभव होता. याचा लाभ भारतीय जनतेला झाला. या १० वर्षांत भारताचा वेगाने विकास झाला, भारताबाहेर भारताचा डंका वाजू लागला, अतिरेकी आणि पाकिस्तान पहिल्यांदा आपल्याला घाबरू लागला, गरिबांना वीज, सिलेंडर, घरे इत्यादी सुविधा मिळाल्या; त्याचबरोबर देशात हिंदुभावविश्व मजबूत झाले.

मोदींकडे त्यांनी केलेल्या कामांची भलीमोठी यादी आहे. मला वाटतं मोदी हे पहिले असे पंतप्रधान आहेत, जे आपण काय काय केलं हे ठामपणे सांगू शकतात. 'ओपिनियन पोल्स'मध्ये मोदी बहुमताने जिंकतील, अशीच भविष्यवाणी करण्यात आली आहे. या सर्व गोष्टींमुळे काँग्रेस चिंतित आहे. मोदींना घालवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. कारण, त्यांना भारताशी काही देणे-घेणे नसून केवळ सत्तेची फळे चाखायची आहेत. म्हणून 'संविधान वाचवा,' असे म्हणणारे राहुल गांधी काश्मीरमध्ये संविधान लागू करू शकले नाहीत. आताची २०२४ ची निवडणूक ही साधीसुधी निवडणूक नसून हे एक युद्ध आहे, हे आपण जाणून घेतलं पाहिजे आणि हे युद्ध आपल्याला कोणासंगे लढायचं आहे? तर माणुसकीच्या शत्रूसंगे... अमित शाह यांना भारतीय पत्रकार विचारतात की, पाकिस्तानात भारताच्या एजेन्सीज अतिरेक्यांना ठार मारत आहेत. हे काय होतंय्? यावर अमित शाह ठामपणे उत्तर देताना विचारणा करतात की, 'अतिरेकी मेल्याचा तुम्हाला का त्रास होतोय्?' हे जे स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारे लोक आहेत, ते घातक वृत्तीचे आहेत. म्हणूनच तर मारिया आलम खान यांच्या विधानाबद्दल ही चाय-बिस्कुट मीडिया गप्प बसली.



सलमान खुर्शिद यांची भाची मारिया आलम खान यांनी मोदींना घालवण्यासाठी मुसलमानांना 'व्होट जिहाद' करायला सांगितले आहे. व्होट जिहाद? आधी लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद यानंतर आता 'व्होट जिहाद.' हिंदू मुलींच्या शरीराचे तुकडे करून कधी सुटकेसमध्ये, कधी फ्रिजमध्ये टाकून झाले. जम्मू-काश्मीरमध्ये हिंदूंचा नरसंहार करून त्यांच्या जमिनी बळकावून 'लॅण्ड जिहाद' करून झाला. आता 'व्होट जिहाद' करून भारतात १०० पाकिस्तान निर्माण करायचे आहेत का? आजही मुसलमानबहुल भागात हिंदू जायला घाबरतात. हे असं का होतं, हा प्रश्न मुसलमान जनतेने स्वतःला विचारला पाहिजे. 'इस्लामोफोबिया' असं गोंडस नाव देऊन या विषयाकडे डोळेझाक करून चालणार नाही. ही गंभीर समस्या असून सबंध जगाला ही समस्या सतावते आहे आणि या समस्येचा फायदा काँग्रेस उचलण्याचा प्रयत्न करतेय्. म्हणूनच भारतावर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे, असे ते म्हणतात. संपत्तीचे समान वाटप, धर्माच्या आधारावर आरक्षण ही काँग्रेसने दिलेली हाक भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण करणारी आहे.

मोदींना हरवण्याचे सगळे मार्ग बंद झाल्यामुळे काँग्रेस आता मुस्लिमांना भडकवत आहेत. काही मूठभर उच्चभ्रू मुस्लिम वगळता इतर मुस्लिम समाज मागास राहिला. याला कारण काँग्रेस आणि मुस्लिमांमधील राजकीय नेते आहेत. काश्मीरमध्ये मिसुरडंही न फुटलेल्या मुलांच्या हातात यांनी दगड दिला. त्या पोरांची ओळख काय? तर स्टोन पेल्टर... जणू ही काही खूप मोठी पदवी आहे. ज्या वयात अभ्यास करायचा, स्वतःचं आणि देशाचं नशीब बदलण्याची स्वप्ने पाहायची त्या वयात ही मुलं दगड मारत फिरतात. यांच्या हातात लॅपटॉप दिला असता तर ते मोठ्या हुद्यावर काम करून लाखो रुपये कमावत असते. मात्र, काँग्रेसच्या स्थापनेपासून त्यांना मुसलमान हा विषय हाताळताच आला नाही. मुस्लिम समाजाला धर्मावरून भडकवणं सोपं असतं. याचा फायदा या राजकीय नेत्यांनी घेतला; पण या बदल्यात मुस्लिमांना काय मिळालं? गरिबी, बेरोजगारी आणि अतिरेकी असण्याचा शिक्का? हे चित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बदलायचं आहे. म्हणूनच 'हिंदूंची साथ हिंदूंचा विकास' असं न म्हणता ते 'सबका साथ, सबका विकास' म्हणतात.

वाचकहो, अरबस्थानदेखील आता बदलत आहे. त्यांना आपल्या जुन्या संस्कृतीची आठवण येत आहे. 'एमबीएस' या नावाने ओळखले जाणारे सौदीचे पंतप्रधान मोहम्मद बीन सलमान हे अतिशय आधुनिक व सुधारणावादी विचारांचे मानले जातात. त्यांनी इस्लामपूर्व काळात पुजल्या जाणाऱ्या तीन देवींच्या मूर्ती म्हणजे आपला इतिहास आहे, असं म्हणत त्यांचं प्रदर्शन ठेवलं आहे. अल्-लत, अल्-उझ्झा आणि मनत अशी या देवींची नावे आहेत. कारण त्यांना माहिती आहे की, जग आता खूप बदललं आहे आणि पुढे गेलं आहे. अशा परिस्थितीत आपण केवळ जुन्या खपल्या काढत राहिलो तर आपण या भव्य स्पर्धेत हरवून जाऊ.

हीच बाब भारतीय मुस्लिमांनी लक्षात ठेवायची आहे. काँग्रेसच्या नादाला लागून पुन्हा १००० वर्षे मागे जायचे आहे की १००० वर्षे पुढचा विचार करत विकास साधायचा आहे व स्वतःचे कल्याण करून घ्यायचे आहे, याचा आता या समाजाने गांभीर्याने विचार करायला हवा. इतर सर्व मुस्लिम देशांचा अभ्यास करायला हवा आणि इतक्या वर्षांत भारतीय म्हणून आपल्या अस्तित्वाचेही मूल्यांकन करायला हवे. हिंदूंचा स्वभाव मुळातच बदल घडवणारा असल्यामुळे या जागतिक स्पर्धेत कसे टिकून राहायचे याची त्यांना चिंता नाही. हिंदू पुढे-पुढेच जाणार आहेत. मात्र, काही मूठभर लोकांच्या ऐशोआरामासाठी आणि स्वार्थासाठी आपण किती काळ मागास राहायचे, यावर विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. हीच ती वेळ, हाच तो क्षण... ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### विजय कुळकर्णी

# आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यास शैक्षणिक संस्था उदासीन?

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने राईट ऑफ एज्युकेशन (आरटीई) ही योजना सुरू केली. या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के आभासी पद्धतीने अर्ज करून इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांमध्ये सक्तीने प्रवेश देण्यात येतो. केवळ पैशांअभावी राज्यातील गरीब विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणापासून वंचित राहू नये, हा यामागचा शासनाचा शुद्ध उद्देश आहे. मात्र, राज्यातील विविध खाजगी संस्थांकडून या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

याबाबत वंचित बहुजन आघाडीचे घाटाखालील बुलढाणा जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी थेट राष्ट्रपतींकडेच एका निवेदनातून तक्रार करून आरटीई प्रवेश प्रक्रियेतून वंचितांना दूर ठेवले जात असल्याचे म्हटले आहे. या योजनेंतर्गत प्रवेश अर्ज केलेले राज्यातील ८ लाख ६५ हजार विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. राज्य शासनाच्या शिक्षण संचालक प्राथमिक विभाग पुणे यांच्यामार्फत ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत आभासी पद्धतीने प्रवेश अर्ज करावा लागतो. मात्र, पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी आरटीई साईटवर नोंदणी करण्याचा प्रयत्न केला असता सर्व खाजगी इंग्रजी शाळांचे आभासी पटल बंद असल्याचे आढळले. केवळ मराठी, हिंदी, उर्दू या शाळांच्या साईट सुरू आहेत. जर राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळाले नाही तर ते आयएएस, आयपीएस इत्यादी स्पर्धात्मक परीक्षेत यश कसे काय मिळवू शकतील? स्पर्धात्मक परीक्षा देण्याजोगी त्यांची बुद्धिमत्ता तयार होईल का? असे या निमित्ताने विचारावेसे वाटते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने हे विद्यार्थी भरमसाट शैक्षणिक शुल्क आकारणाऱ्या दर्जेदार इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यांच्यावरील हा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने ही योजना सुरू केली खरी; पण संबंधित शैक्षणिक संस्था त्यांना हवे तेवढे शैक्षणिक शुल्क मिळणार नसल्याने त्यांच्या साईट डिसेबल ठेवत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच, आरटीई अंतर्गत २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देणाऱ्या शाळांचे २०१० ते २०२३ या कालावधीतील हजारो कोटी रुपये शासनाकडे थकित आहेत. त्यामुळे या शैक्षणिक संस्था त्यांच्याकडे आरटीई योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास इच्छुक नसल्याचे वास्तव याबाबत काही संस्थाचालकांशी संपर्क साधला असता समोर आले आहे. तसेच, आपल्या पाल्याला प्रवेश मिळावा म्हणून काही पालक दलालांची मदत घेतात. दलालांच्या माध्यमातून काढण्यात आलेले दाखले खोटे असल्याचे आढळले आहे. अशा खोट्या दस्तावेजांद्वारे प्रवेश मिळविले जात असल्यानेदेखील संबंधित शैक्षणिक संस्था या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची जोखीम पत्करण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे. खोट्या प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेतले जाऊ नये म्हणून शिक्षण संचालनालयाने दस्तावेजांची यादी जाहीर केली आहे. ही कागदपत्रं खोटी आढळल्यास त्या विद्यार्थ्याचा प्रवेश तत्काळ रद्द होईल. आरटीई प्रवेशानंतर कधीही पडताळणी पथक विद्यार्थ्याच्या रहिवासी पत्त्यावर भेट देऊन कागदपत्रांची पडताळणी करणार आहे. तसेच, या योजनेंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरसकट अनुत्तीर्ण केल्याच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानंतर शिक्षण विभागाने याबाबत कठोर पावले उचलून या विद्यार्थ्यांना सरसकट अनुत्तीर्ण करणाऱ्या शाळांची चौकशी करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. शासनाने ५ वी आणि ८ वीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. त्यात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. त्यात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच वर्गात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याची किनार पकडून काही मोठ्या शाळा आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करीत असल्याचे प्रकारही समोर आले आहेत. अशा शाळांची तपासणी करण्याचे निर्देश संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

हे सर्व असताना पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या (कॉन्व्हेंट) शाळा, सीबीएसई पॅटर्नच्या शाळांमध्येच प्रवेश मिळावा, असा हट्ट का धरतात? जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिकांच्याही इंग्रजी माध्यमांच्या दर्जेदार शाळा आहेत. त्यात विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. मग, ते सोडून आरटीईच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमांच्या मोठ्या शाळांमध्येच आपला पाल्य शिकावा, असा हट्ट कितपत योग्य आहे? सुज्ञ पालकांनी यावर विचार करावा व आपल्या पाल्याची बुद्धिमत्ता पाहून त्यांना झेपेल असे शिक्षण द्यावे, असे या निमित्ताने म्हणावेसे वाटते. ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# दिव्याखाली अंधार!

देशातल्या सत्तेला तडीपार करायला निघालेल्या महाराष्ट्रातील भग्न पक्षाच्या नेत्याच्या पक्षाचा ज्या एकमेव ठिकाणी प्रभाव असल्याचे बोलले जात होते, ते ठिकाण म्हणजे मुंबई. मुंबईसाठी आम्हीच लढा दिला, आमच्यामुळेच मुंबई वाचली, नाहीतर महाराष्ट्रात राहिली नसती. मराठी माणूस आमच्यामुळे मुंबईत जगला नाहीतर नामशेष झाला असता. आजही मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे, पण तो आम्हीच हाणून पाडत आहोत, असे अनेकानेक दावे करणाऱ्या नेत्याचा भग्न पक्ष हा त्याच मुंबईतील लोकसभेच्या पूर्ण सहा जागादेखील लढत नाही आहे. सहापैकी केवळ चार जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यातही सर्वात गमतीची बाब म्हणजे स्वतः राहत असलेला मतदारसंघ स्वतः लढवू शकत नाही, काँग्रेस पक्ष लढणार आणि हे 'पंजा'ला मतदान करणार इतकी नामुष्की यांच्यावर ओढवली आहे. महत्त्वाचं म्हणजे यातील एकाही जागेवर यांच्या उमेदवारांच्या विजयाची तसूभरही शक्यता दिसत नाही आहे. त्यामुळे अशा या परिस्थितीला मराठीतील एकमेव म्हण लागू होते ती म्हणजे 'दिव्याखाली अंधार!'

महाराष्ट्रातील २० मे रोजी शेवटच्या अर्थात पाचव्या टप्प्यात होऊ घातलेल्या सर्वाधिक १३ मतदार संघांपैकी सहा मतदारसंघ हे मुंबईतील आहेत. मुंबई दक्षिण, मुंबई दक्षिण-मध्य, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर-पश्चिम अशी मुंबईतील सहा मतदारसंघ आहेत. या सहा लोकसभा मतदारसंघांत लढाईची रेषा आखण्यात आली असून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष, मुंबई दक्षिण, मुंबई दक्षिण-मध्य आणि मुंबई उत्तर-पश्चिम या तीन जागांवर आपसात भिडणार आहेत. तर, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-मध्य या दोन जागांवर भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये लढत होणार आहे. मुंबई उत्तर-पूर्व या एका जागेवर उबाठा आणि भाजपा यांच्यात थेट टक्कर बघायला मिळणार आहे.

दक्षिण मुंबईत उद्धव ठाकरेंचे विद्यमान खासदार अरविंद सावंत यांची लढत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या यामिनी जाधव यांच्याशी होणार आहे. जाधव या मुंबईतील भायखळा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. उबाठा गटाचे नेते अनिल देसाई हे शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे विद्यमान खासदार राहुल शेवाळे यांच्या विरोधात दक्षिण-मध्य मुंबईत उभे आहेत.



ठाकरे कॅम्पचे अमोल कीर्तिकर यांची मुंबई उत्तर-पश्चिममध्ये सत्ताधारी शिवसेनेचे जोगेश्वरी पूर्व क्षेत्रातील विद्यमान आमदार रवींद्र वायकर यांच्याशी लढत होणार आहे. मुंबई उत्तर-मध्यमधून भाजपाने रिंगणात उतरवलेले प्रसिद्ध वकील उज्ज्वल निकम यांच्या विरोधात काँग्रेसच्या आमदार वर्षा गायकवाड या दोन हात करणार आहेत तर केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे दिग्गज नेते पीयूष गोयल यांची उत्तर मुंबईत काँग्रेसचे उमेदवार भूषण पाटील यांच्याशी लढत आहे. उत्तर-पूर्व मुंबईत भाजपाचे मिहीर कोटेचा आणि उबाठा गटाचे संजय दिना पाटील यांच्यात लढत आहे. कोटेचा हे मुंबईतील मुलुंड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत तर संजय पाटील माजी खासदार आहेत. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २००९ मध्ये या भागातून लोकसभेवर निवडून गेले होते. २०१९ मध्ये 'घड्याळ' चिन्हावर दारुण पराभव झाला होता. आता उबाठा गटाकडून निवडणूक रिंगणात आहेत.

२०१९ मध्ये उदयास आलेल्या राजकीय पुनर्संरचनेनंतर ही पहिली मोठी निवडणूक चाचणी म्हणावी लागेल. त्यामुळे आता 'किसमे कितना है दम' हे बघण्याची वेळ आली आहे. यावेळी लोकसभा निवडणुकीत मुंबईतील सहा मतदारसंघांमध्ये काय होणार, याची उत्सुकता सर्वांना लागलेली आहे. ठाकरेंचा बालेकिल्ला अर्थात ते म्हणवून घेतात; तो बालेकिल्ला आता ढासळताना दिसत आहे. मुंबई आणि ठाण्यात ठाकरेंना आणि मविआतील अन्य घटक पक्षांना मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत. मुंबईतील सहापैकी सहा जागांवर आणि ठाणे, कल्याण येथे महायुतीचे उमेदवार विजयी होण्याचे संकेत लोकं देत आहेत. यापैकी केवळ दक्षिण मुंबई आणि ईशान्य मुंबईत थोडी चुरस पाहायला मिळू शकते. अन्यथा बाकी जागांवर महायुतीचे उमेदवार सहजपणे विजयाकडे वाटचाल करीत आहेत.

मुंबईतील उत्तर-मुंबई लोकसभा मतदारसंघ हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जातो. यंदा या मतदारसंघातून भाजपाकडून पीयूष गोयल रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे या मतदारसंघात भाजपाचा विजय जवळपास निश्चित आहे. पण त्याचवेळी दक्षिण मुंबई, वायव्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई या तीन मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाचे पारडे जड मानले जात होते. परंतु, दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई आणि वायव्य मुंबईतून अमोल कीर्तिकर हे पराभवाच्या छायेत आहेत. ईशान्य मुंबईत ठाकरे गटाचे संजय दिना पाटील हे भाजपाच्या मिहीर कोटेचा यांच्याशी संघर्ष करीत आहेत. पण मागील वेळेस संजय पाटलांचा मोठा मताधिक्याने पराभव झाला होता. त्यामुळे तेवढी मोठी तफावत कमी करणे पाटलांसाठी अशक्यप्राय बाब आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे या सर्व ठिकाणी ठाकरे गटाच्या उमेदवारांचा, मविआच्या उमेदवारांचा टिकाव लागणे कठीण झाले आहे. आजची ही मुंबईतली ठाकरे आणि त्यांच्या सोबत असलेल्या घटक पक्षांची परिस्थिती चिंताजनक आहे. विद्यमान खासदारांच्या जागा, मुंबई आपल्या बापाची असल्याचा समज असणाऱ्यांना मुंबईच्या जागा वाचविण्यात अपयश येत असताना, महाराष्ट्रातील जनता 'माझा परिवार माझी जबाबदारी'पुरतीच जबाबदारी हाती देतात की काय, अशी शंका असताना, याला तडीपार, त्याला तडीपार करण्याची भाषा हास्यास्पदच म्हणावे लागेल. त्यामुळे देशातील सर्व राज्यांत निवडणुका लढणाऱ्या पक्षाला, देशात सर्वाधिक खासदार, आमदार असणाऱ्या, जगात सर्वात मोठ्या असणाऱ्या पक्षाला, एका राज्यात त्यादेखील पूर्ण नव्हे तर अर्ध्याहून कमी जागांवर निवडणूक लढणाऱ्या पक्षाच्या नेत्याने आपली गल्लीतली पत ओळखून सल्ले किंवा आव्हान दिले पाहिजे, अन्यथा जनताच तुमचं हसं करेल यात शंका नाही. ▮

९२७०३३३८८६

## कुटुंब नियोजनावर बोला हो!

सध्या लोकसभा निवडणुकीचा हंगाम चालू आहे. इंडिया व रालोआ अशा दोन प्रमुख आघाड्या, ज्यात घटक पक्षांच्या अंतर्भाव आहे, आमनेसामने उभ्या ठाकल्या आहेत. परंतु खरी लढाई सत्ता प्राप्त करण्यासाठी भाजपा-काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांत आहे. लढाई, वादविवाद, आरोप-प्रत्यारोप चालू असून निरनिराळी प्रलोभने दिली जात आहेत. त्यात भाजपा सरकारने १० वर्षांत काय केले तर काँग्रेसची ७० वर्षे सत्ता असताना काय नाही केले, यावर जास्त जोर दिला जात आहे. भाजपाने १० वर्षांत जो काही चमत्कार व देश-विदेशामध्ये भारताचे नाव कसे उंचावले व काँग्रेस पक्षाने ७० वर्षांत देश-विदेशात भारताचे नाव कसे बदनाम करण्याचा प्रयत्न केला, यावर दोन्ही पक्षात आगपाखड चालू आहे. भ्रष्टाचार, आतंकवाद, परिवारवाद यावर भाजपा घणाघाती हल्ला करीत आहे. तर, काँग्रेस पक्ष व सहचारी पक्ष बेरोजगारी, महागाई, आरक्षण हे विषय घेऊन वाद उकरीत आहे. १० वर्षांत आर्थिक स्थिती सुरळीत करून शेतकरी, गरीब, महिला सन्मान, शिक्षण यात किती प्रगती केली, यावर भर देऊन भाजपा सत्ता प्राप्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असून काँग्रेस मोदींना शिव्याशाप देत आहे. काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेते काँग्रेस पक्ष सोडून भाजपात सामील होऊन राहिले तरी काँग्रेस पक्षाला याचे कारण अजून उमगले नाही. सनातन धर्मावर प्रहार करणे हा काँग्रेस व घटक पक्षाचा एक वेगळा कार्यक्रम झाला आहे. लोकशाही व संविधान नष्ट होणार हे आवर्जून सांगत आहेत; पण कोणताही पक्ष कुटुंब नियोजनावर लोकसंख्या स्थिर ठेवणे यावर लक्ष केंद्रित करीत नाही, त्याबद्दल कोणताही पक्ष बोलत नाही. भारताची लोकसंख्या नियंत्रणा पाहिजे असताना काँग्रेस पक्ष या कारणाकडे दुर्लक्ष करीत आहे. एवढी भयानक लोकसंख्या हे त्यांना कळत नाही काय? चीननंतर दुसरा नंबर भारताचा आहे, हे स्पष्ट दिसत असताना त्याकडे दोन्ही पक्ष कानाडोळा करीत आहे असं वाटते. कोणताही पक्ष सत्तेवर आल्यास लोकसंख्या वाढीला आळा घालण्यापासून ज्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. बहुमतासाठी लोकसंख्या जरी जरूरी असली तरी तिचा स्फोट झाल्यास काय परिणाम घडेल हे सांगता येत नाही, असे वाटते.

**मधुसूदन भावे**/इंदूर

## वाचक पत्रे

### आता दुसरे कारण शोधा!

'ईव्हीएम हटनी चाहिये, बॅलेट पेपरही सही था, ये भाजपा वाले मशीनमें सिर्फ कमल ही डालके रखते है. कोई भी बटन दबाओ वोट कमल को ही जाता है...' अशी वक्तव्ये विविध विरोधी नेते करतात. जिथे जिथे हरण्याची कुणकुण लागते तेथे हेच कारण पुढे केले जाते व जिथे जिंकतात तेथे लोकशाहीचा विजय होत असतो. ईव्हीएम नको म्हणून खुपदा आंदोलने, अनेकदा चर्चा, बरेचदा तोडफोड वगैरे झाली; पण शेवटी सुप्रीम निर्णय आला की, मतदान होणार ते ईव्हीएम मशीननेच! आता प्रश्न पडला की, चर्चेतील हा महत्त्वाचा मुद्दा गायब झाला; आता कोणता मुद्दा विरोधक आणतील? राहुल गांधी म्हणतात, मोदी आता रडतील. राहुल बाबा, मोदी हे रडले होते आईची आठवण सांगताना, मोदी हे रडले होते पुलवामा हुतात्म्यांसाठी. आपण आपल्या भाषणात कधीतरी इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे नाव घेतले आहे का? कधीतरी काँग्रेसच्या जुन्या खंद्या नेत्याचे आभार मानले आहे का? त्यामुळे अश्रूंची किंमत आपल्याला कळणार नाही. मतदार हा जागृत आहे व राहणारच. तंत्रज्ञानाने उंचीवर भारत गेलेला आहे तो अजून उंच जाणारच. मग कशाला आठवता तो बॅलेट पेपर. ईव्हीएमला स्वीकारा अन्यथा दुसरे कारण लवकर शोधा. कारण खापर फोडण्याची वेळ तुमच्यावर म्हणजे विरोधकांवर येणार आहे, हे नक्की.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### मतपत्रिकांचा काळ संपला!

ईव्हीएमद्वारे झालेल्या मतदानाची व्हीव्हीपॅटशी संपूर्ण पडताळणी करण्यात यावी यासोबतच पूर्वीप्रमाणेच मतपत्रिकांद्वारे मतदान घेण्यात यावे या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच फेटाळून लावल्या. याशिवाय आता मतपत्रिकांचा काळ परत येणार नाही, असा स्पष्ट संदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. खरं तर याआधीही अनेकदा ईव्हीएम प्रणालीवर अनेक चर्चा झाल्या, निवडणूक आयोग व न्यायालयानेही यासंदर्भात पुरावे मागितले, पण कुणीही पुरावे सादर करू शकले नाही व ईव्हीएम प्रणाली सदोष आहे हे सिद्ध करू शकले नाही. मतपत्रिकांचा जुना काळ आजही आठवतो. मतपत्रिकांद्वारे अनेक मतं अवैध व्हायची, मतपत्रिका गहाळ व्हायच्या, मतमोजणीत खूप विलंब होत असे. याशिवाय भारतासारख्या अफाट लोकसंख्या असलेल्या देशात ही पद्धत खूप वेळखाऊ होती. एकीकडे संपूर्ण जग भारतातील निवडणूक हाताळण्याच्या कौशल्याचं कौतुक करत असताना दुसरीकडे आपल्याच देशातील काही लोक यावर प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत. या देशातील स्वायत्त संस्थेवर अविश्वास दाखवून लोकशाही बदनाम करण्याच्या प्रवृत्तीस सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ही मोठी चपराक आहे. घटनात्मक संस्थांवरील विश्वासच आपल्या देशातील लोकशाही अधिक मजबूत करेल तेव्हा विरोधकांनी आता तरी या आधुनिक मतदान पद्धतीचा स्वीकार करावा व येथील लोकशाही अधिक बळकट करावी, हीच अपेक्षा आहे. ▮

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# शॉर्टसर्किटमुळे दोन एकर मधील ऊस जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ३ मे -**

विद्युत महामंडळाच्या पोलवरील तारा एकत्र येऊन शॉर्टसर्किट झाल्यामुळे पेट घेऊन दोन एकर मधील ऊस व तुषार सिंचन चे पाईप बंडल जळून खाक झाल्याने असे एकूण ७ लाख ५० हजार रुपयाची नुकसान झाल्याची तक्रार तुप्पा येथील रहिवासी मनोहर गोविंदराव कदम यांनी विद्युत महामंडळ यांच्याविरोधात दिनांक २ मे रोजी नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबुळगाव शिवारातील गट क्रमांक शंभर मध्ये मनोहर गोविंदराव कदम यांचे ४ एकर जमीन असून त्यातील २ एकर मध्ये ऊस लावलेला आहे आणि तो ऊस रसवंतीसाठी ठेवलेला आहे. या उसाच्या शेतातून विद्युत मंडळाची विद्युत तार गेलेली असून ही तार फारच खाली ऊसाला टेकत होती आणि ती वाऱ्याने हलल्याने त्या दोन तारा एकमेकांना लागून शॉर्टसर्किट झाल्याने अग्नीची ठिणगी पडून ऊसाला आग लागली. ही घटना दिनांक १मे रोजी दुपारी १:३० वाजता घडली आहे. या घटनेत दोन एकर ऊस जळून खाक झाला आहे. तरी या जळीत ऊस प्रकरणास शेतकरी मनोहर कदम यांचे ऊस व तुषार पाईपचे चार बंडल असे एकूण ७ लाख ५० हजार चे नुकसान झाले झाल्याने शेतकरी मनोहर कदम यांनी विद्युत महामंडळावर नांदेड ग्रामीण ठाणे येथे नुकसान भरपाईचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदरील घटनाही विद्युत महामंडळाच्या दुर्लक्षामुळे झाले असल्याचे शेतकरी मनोहर कदम यांनी आपल्या तक्रारी दिली आहे.



# खुनासह घरफोड्याच्या गुन्ह्यात फरार असलेल्या अट्टल गुन्हेगारास अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ मे -**

खुनासह घरफोड्याच्या गुन्ह्यात फरार असलेल्या अट्टल गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्याच्याकडून ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

खून व घरफोड्यातील अट्टल गुन्हेगार संतोष उर्फ चॉकलेट्या बापूराव भोसले रा. वहाद ता. कंधार हा त्याच्या घरी आला असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास त्याच्या गावी जाऊन अटक केली. त्याच्याकडून कंधार, देगलूर, मुखेड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २०० ग्रॅम चांदीचे दागिने व नगदी २१ हजार रुपये असा एकूण ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. आरोपी संतोष उर्फ चॉकलेट्या भोसले यास पुढील कारवाईसाठी मुखेड पोलीस पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक माधव केंद्रे, पोहेकॉ गुंडेराव करले, संजीव जिंकलवाड, देविदास चव्हाण, रणधीरसिंह राजबंसी, मोतीराम पवार, ज्वालासिंग बावरी, गजानन बयनवाड, बालाजी यादगीरवाड, कलीम शेख, हनुमानसिंह ठाकूर यांच्या पथकाने पार पाडली.

# 'स्वारातीम' विद्यापीठाचे महाराष्ट्र शासनाकडून अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ मे -**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व राष्ट्रीय सेवा योजना राबविणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सन २०२२-२३ पासून पी.एफ.एम.एस. प्रणाली नव्याने राबविण्यात आली. या नवीन प्रणालीमध्ये महाराष्ट्र शासनास 'उपयोगिता प्रमाणपत्र' सादर करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरले. त्यामुळे राज्य संपर्क अधिकारी डॉ. निलेश पाठक, महाराष्ट्र शासन यांनी पत्राद्वारे विद्यापीठाचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

या प्रणाली अंतर्गत सर्व विद्यापीठे व महाविद्यालयामध्ये नवीन झिरो बॅलन्स सबसिडीअरी अकाउंट (ZBSA) एस.बी.आय. बँकेमध्ये करंट खाते काढण्यात आले. परंतु सर्वांनाच नवीन नइड- करंट खाते उघडणे, विद्यापीठ व शासनाकडून मॅपिंग करून घेणे, डेटा ऑपरेटर, डेटा अप्रुव्हर, एक्सपेंडिचर आणि इलेक्ट्रॉनिक प्रिंट पेमेंट डव्हाइस जनरेट करणे हे सर्व विद्यापीठातील संचालक, संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य व कार्यक्रमाधिकारी यांच्यासाठी एक नवीन आव्हानच होते.

शासनाच्या निर्देशानुसार पी.एफ.एम.एस. प्रणाली मार्फतच राष्ट्रीय सेवा योजनेचे अनुदान प्राप्त होणार होते.

# महावितरण नांदेड क्रिकेट सामन्यात केसरी संघ विजयी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ मे -**

दि.१मे रोजी कामगार दिन महाराष्ट्र दिन आणि आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने नांदेड परिमंडळ अंतर्गत तीन्ही मंडळाच्या अधिकारी व महावितरण कर्मचाऱ्यांचे क्रिकेटचे सामने घेण्यात आले . त्या क्रिकेटच्या सामन्यांमध्ये नांदेड परिमंडळातील परभणी हिंगोली नांदेड या तिन्ही मंडळातील खेळाडूंनी या स्पर्धेत १६ संघाने सहभाग नोंदविला. सर्व संघाने अतिशय उत्कृष्ट प्रदर्शन केले .व उपांत्य फेरीत चार संघ आले त्यामध्ये १) महावितरण रायडर्स २) महावितरण रॉयल चॅलेंजर्स वसमत ३) महावितरण फायटर ४) महावितरण केसरी उपांत्य फेरीसाठी पहिला मॅच महावितरण रायडर्स आणि महावितरण फायटर यांच्यात खेळला गेला. या उपांत्य फेरीत महावितरण रायडर्स संघ विजयी झाला. दुसरा उपांत्य फेरीचा सामना महावितरण केसरी व महावितरण रॉयल चॅलेंजर्स संघात अत्यंत चुरशीचा सामना झाला .या सामन्यात महावितरण केसरी संघ विजयी झाला .अंतीम फेरीसाठी महावितरण रायडर्स व महावितरण केसरीची लढत झाली व या अंतीम फेरीत महावितरण केसरी संघाने एक हाती विजय मिळवीला अशाप्रकारे प्रथम पारितोषिक २१०००रु महावितरण केसरी संघाने मीळविले केसरी संघाचे नेतृत्व कप्तान ईश्वर सिंग टेलर यांनी केले.व द्वितीय पारितोषिक ११००० रु महावितरण विधुत भवन रायडर्स संघ यानी मीळविले नेतृत्व रायडर्स चे कप्तान पंडित आंबेकर यांनी केले.,आणि तिसरे पारितोषिक ७००० रु महावितरण रॉयल चॅलेंजर्स संघाने मिळवीले रायलसचे नेतृत्व कप्तान अजय काशीद यानी केले. सर्व सामने यशस्वी करण्यासाठी सुदर्शन कालेवाड , तोहसीफ पटेल , मिलिंद कांबळे सर,महेश गटुवार सर,श्रीरसागर सर ईश्वर भाई, मोहनसिंग झांगडे सर ,दुकानदार सर, अशोक कुट्टेकर यांनी अथक परिश्रम घेतले.स्पर्धेसाठी समालोचन पंडित तेलंग , गिरीष डोंणगावकर , प्रमोदजी देशमुख , विजय रणखांब , गुरू भाई यांनी खूप छान कॉमेंट्री केली.वरील सर्व सामन्यासाठी पंच म्हणून विराट अँकॅडेमीचे संचालक सुनील यादव सर आणि त्यांचे सहकारी यांनी सामन्यासाठी खूप छान अंपायरीग केली गोविंद टर्फचे व्यवस्थापक साजन भाईचे टुर्नामेंट यशस्वी करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### माध्यमिक आश्रम शाळा कमळेवाडीचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश

**बाऱ्हाळी -** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मा. आ. शा. कमळेवाडीचे इयत्ता ५ वी व ८ वी चे अनुक्रमे २६ व १२ असे एकूण ३८ विदयार्थी बसले होते त्यापैकी ५ वीचे दहा व ८ वीचा एक विदयार्थी असे एकूण ११ विदयार्थी पात्र झाले आहेत. पात्र विद्यार्थ्यांमध्ये विवेक राठोड, शुभम गजभारे, कु. वेदिका चव्हाण, कु. सुलोचना गीते, कु. दिव्या चव्हाण, साईनाथ गिरी, कु.शुभांगी पवार, कु. राधिका चव्हाण, कु. संध्याराणी हक्के, विश्वजीत राठोड आदींचा समावेश आहे. या यशाबद्दल सर्व पात्र विदयार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुखेड विधानसभा मतदार संघांचे लोकप्रिय, कार्यसम्राट आमदार डॉ. तुषार राठोड, वि. जा. से. स. संस्थेचे अध्यक्षा श्रीमती चक्रावतीबाई राठोड, सचिव गंगाधरराव राठोड साहेब, शाळेचे मु. अ. संदीप गेटकेवार यांनी अभिनंदन केले. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी पालक व मार्गदर्शक शिक्षक चौडेकर प्रवीण, मठपती संगम, मोरे गीतेश, कांबळे सिद्धांत, श्रीरामे पंडित, पाटील सुधाकर, गुंटूरकर संदीप, तसेच सौं. चिद्गुवार एलिझाबेथ, सौ. लिंगणवाड आरती, सौ. राठोड प्रभावती, सौ. चौधरी जयश्री यांना दिले.

### महाराष्ट्र दिनानिमित्त सिडको परिसरात ठीक-ठिकाणी ध्वजारोहण

**नवीन नांदेड -** महाराष्ट्र दिनानिमित्त सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालय येथे सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड यांच्या हस्ते तर सिडको कार्यालय येथे सिडको कार्यालयाचे प्रशासक परमेश्वर मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला त्याचप्रमाणे परिसरात शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत येथेही ध्वजारोहण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १ मे २०२४ रोजी सकाळी ६: ४५ वाजता सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालय येथील सहाय्यक आयुक्त संभाजी माधवराव कास्टेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, सुधीरसिंह बैस, प्रभू गिराम, किशन वाघमारे, अर्जुन बागडी, दीपक पाटील, मारोती सारंग, मालू यनफळे, मारोती चव्हाण, संतोष भदर्गे, बालाजी लोहगावकर यांच्यासह क्षेत्रीय कार्यालयातील सर्वच कर्मचारी उपस्थित होते. तर सिडको कार्यालय येथे सकाळी ठीक ६:५५ वाजता सिडको कार्यालयाचे प्रशासक परमेश्वर मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयाची कर्मचारी संकेत गिरी,गणेश शुक्ला, विलास जोशी यांच्यासह किशन काळे, गजानन वाघमारे व सुरक्षा रक्षक यांची उपस्थिती होती. तसेच गोपाळ चावडी ग्रामपंचायत येथेही महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण सरपंच गिरजाबाई डाकोरे यांच्या हस्ते उपसरपंच साहेबराव शेलुकर व ग्रामविकास अधिकारी उबाळे यांच्या उपस्थित करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरीक, अंगणवाडी सेविका यांची उपस्थिती होती.

### नांदेडात १० मे रोजी सैलानी बाबांचा संदल

**नांदेड -** हजरत हाजी अब्दुल रहेमान उर्फ सैलानी बाबांचा संदल येत्या दि.१० मे (शुक्रवारी) गंगाचाळ डंकीन समोर असलेल्या दर्गा येथे होणार असल्याची माहिती येथील मुख्य पुजारी रघुबाबा यांनी दिली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील गंगाचाळ डंकीन भागात असलेल्या सैलानी बाबांच्या दर्गा येथुन संदल मिरवणूक काढण्यात येते. यावर्षीही येत्या दि.१० मे (शुक्रवारी) सायंकाळी ५ वाजता गोदावरीच्या घाटावरुन या संदल मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक भीमघाट, देगावचाळ, पक्कीचाळ पोलीस चौकी ते गंगाचाळ पासून डंकीन समोरील सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचेल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. वसंतराव चव्हाण, नांदेड दक्षिण विधानसभेचे आ. मोहनअण्णा हंबर्डे, गणपत धबाले, पप्पु (प्रदीप) जाधव, विलास धबाले, विश्वनाथ घडलिंगे, विश्वनाथ वाघमारे, रमेश गोडबोले, डॉ.अब्दुल बाकी, मुकुंद भोळे, राजू मोरे, बंटी लांडगे, ऍड.महेश हाळदे, ऍड.विकास वाघमारे, केशव नवरे यांची उपस्थिती राहणार आहे. तरी सर्वधर्मीय सैलानी बाबा भक्तांना सदरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सैलानी बाबा दर्गा ट्रस्टच्यावतीने चांदू बुरुडे, राजूसिंघ महाराज, बिट्टूसिंघ महाराज, बाबुभैय्या ठाकूर, ॲड. जोशी, तुळशीराम कोकरे, अर्जुन ठाकूर, मुख्तारभाई, चंदु वाघमारे यांनी केले आहे.

# लातूर लोकसभेसाठी ड्युटी लागलेल्या कर्मचाऱ्यांसाठी ५ मे रोजीची बस व्यवस्था

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ मे -**

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदान केंद्राध्यक्ष व मतदान ,अधिकारी कर्मचारी यांना निवडणूक कर्तव्यासाठी त्यांना नेमूण दिलेल्या ८८-लोहा विधानसभा मतदार संघात जाण्यासाठी केलेल्या बसेसच्या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च, २०२४ पासून लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषीत केलेला आहे, ४१-लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदान दि. ७ मे रोजी पार पडणार आहे. सदरील निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी,कर्मचारी यांना ८८-लोहा विधानसभा मतदारसंघात घेऊन जाण्यासाठी प्रशासनाच्या वतीने वाहतूक व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या संदर्भातील खालील प्रमाणे सूचना करण्यात आली आहे.

८३-किनवट, ८४-हदगाव, ८५-भोकर, ८६-नांदेड उत्तर, ८७-नांदेड दक्षिण, ८९-नायगांव खै, ९०-देगलूर आणि ९१-मुखेड या विधानसभा मतदारसंघातून ४१-लातुर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कामासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक ५ मे २०२४ रोजी प्रशिक्षणासाठी ८८-लोहा विधानसभा मतदारसंघा अंतर्गत मतदान केंद्रावर जाण्यासाठी खालील प्रमाणे बसेसच्या विधानसभानिहाय थांबे निश्चित करण्यात आलेली आहे.

नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी ४१-लातूर लोकसभा मतदारसंघातील निवडणूक कर्तव्य पार पाडण्यासाठी विविध विधानसभा मतदान संघातून ८८-लोहा विधानसभा मतदारसंघात जाण्यासाठी दिनांक ५ मे २०२४ रोजी सकाळी ६ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रामीण भागात प्रोटीनयुक्त आहाराचे स्टॉल उभारणार : मिनल करनवाल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३ मे -**

जंक फूड ऐवजी प्रोटीनयुक्त आहार आरोग्यासाठी महत्त्वाचा असून ग्रामीण भागात आता प्रोटीनयुक्त आहाराचे स्टॉल उभारण्याचा मानस असल्याचे नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी व्यक्त केला.

जंक फूड अर्थात फास्ट फुड हे आरोग्यासाठी चांगले नसून जंक फूडच्या सेवनाने शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते. त्यामुळे रक्तदाब व शुगरचे प्रमाण वाढत आहे. लहान मुलं व गरोदर माता यांच्यासाठी तर हे फारच हानिकारक आहे. जंक फूडमध्ये पोषक तत्वाचे प्रमाण कमी असते परंतु त्याच्या चवीमुळे अनेकांना जंग फूड खायला आवडते. परंतु गेल्या २५ वर्षाच्या अभ्यासानुसार फास्ट फुडच्या सेवनाने हृदयरोग, शुगर आदींचे प्रमाण वाढले आहे.

यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी मुंबई येथील आयआयटी आहारशास्त्र विभागाशी समन्वय साधून जानेवारी २०२४ मध्ये आरोग्य विभागातील डॉक्टर्स, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, कर्मचारी तसेच बाल विकास विभागाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षीका यांची कार्यशाळा घेऊन प्रशिक्षण दिले. गुरुवार २ मे रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, आयुष्य, आरबीएसके चे डॉक्टर्स, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमची टीम, आहार तज्ञ, बाल तज्ञ यांची बैठक घेऊन प्रथिने का खायची, किती खायची व कुठून खायचे यावर साधक- बाधक चर्चा केली. सुरुवातीला डॉक्टर्सनी एक महिना स्वतः च्या आहारावर लक्ष द्यायचे आहे. दिनांक ३० मे म्हणजे एक महिन्यानंतर परत एकदा ही टीम भेटणार आहे. यावेळी तुम्ही काय केलं, आपण हे करू शकलो की नाही, प्रोटीनयुक्त आहारामुळे आरोग्यावर काय परिणाम झाला यावर चर्चा करण्यात येणार आहे.

त्यानंतर जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात जंक फूड एवजी प्रोटीनयुक्त आहारांचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. तसेच गावस्तरावर प्रोटीनयुक्त आहारांचे स्टॉल उभे करणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल कारनवाल यांनी सांगितले. या मागचे उद्दिष्ट असे की, लहान बालक, गरोदर माता तसेच सर्वसाधारण नागरिक हे मोठ्या प्रमाणात तळलेली व गोड पदार्थ खातात हे आरोग्याला हानिकारक आहे. ज्यामुळे रक्तदाब, मधुमेह तसेच श्वसन संस्थेवरील होणारे परिणाम जसे की दमा, धाप लागणे अशा समस्या उद्भवू शकतात. हे उद्भवणारे आजार जंक फुड मुळेच होत असतात.

त्यामुळे आरोग्यासाठी प्रोटीनयुक्त आहार महत्त्वाचे आहे. नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन हैदराबाद नुसार प्रत्येकाच्या शरीराची प्रोटीनची गरज १ ग्रॅम/ किलोग्राम वजन असे प्रमाणात असणे गरजेचे आहे. परंतु, बऱ्याच अभ्यासांती असे दिसून आलेले आहे की, आपल्या रोजच्या आहारात प्रोटिनची मात्रा गरजेच्या प्रमाणात खूप कमी जाते. त्याला वर उल्लेखलेले कारणे महत्त्वाची आहेत. प्रोटीनच्या कमतरतेमुळे शरीराची झीज भरून निघत नाही, रोग प्रतिकार क्षमता वाढत नाही, अनेमियाचे प्रमाण वाढते, शरीर विविध जंतू संसर्ग आजारांना बळी पडते, तसेच दीर्घ कालावधी मध्ये (वर्षानुवर्षे) योग्य व प्रमाणात प्रोटीन शरीरास नाही मिळाल्यास इतर अ-सांसर्गिक गंभीर आजारांना सुद्धा शरीर बळी पडते. उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला, या म्हणीप्रमाणे आपण आजारी पडण्यापासून परावृत्त होण्यासाठी प्रोटीनयुक्त आहार महत्त्वाचा असून, पुढे होणारे संभाव्य आजारांचे धोके टाळण्यासाठी आजपासूनच आपल्या शरीरास योग्य प्रमाणात प्रोटीन देणे महत्वाचे आहे (आजारी असणाऱ्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्याने प्रोटिन बाबत सल्ला घेऊनच हे करावे). रोजच्या आहारात प्रोटीनची मात्रा वाढविण्यासाठी रोजच्या आहारात व सवयींमध्ये थोडे बदल करणे अनिवार्य आहे. त्यासाठी नागरिकांनी प्रोटीनयुक्त आहार सेवन करण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे. कुपोषणमुक्ती व आरोग्य संवर्धनासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 39 - Beed Parliamentary Constituency | Pankaja Gopinath Munde | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Pimpri S.C.C.No. 6635/ 2023 Dtd. 05.12.2023 Unready Board | IPC 188, 279 Disaster Management Act 51B, Epidemic Diseases Act 3 | NIL | NIL | NIL |
| 2. | | | Jt. C.J.J.D and J.M.F.C., Patoda S.C.C.NO. 1366/ 2022 Dtd.05.09.2022 Argument on Exhibited -unready | IPC 188, 269, 270 Disaster Management Act 51B | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **39 - Beed Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**

# जलेश्वर तलावातील गाळ नेण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी

## २० जेसीबीद्वारे गाळ उपसा सुरू, वाहनधारकांना पोलिसांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

शहरातील पांडव कालीन जलेश्वर तलावातील गाळ ऊपसा करण्यासाठी शेतकरी टिप्पर, ट्रॅक्टर तलावाच्या पात्रातून गाळ वाहनांद्वारे नेत आहेत. सदरील गाळ वाहून नेणाऱ्या वाहनांना पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी वाहने हळू चालविण्याचे आवाहन केले आहे.

येथील जलेश्वर तलाव जवळपास ५० एकरात पसरलेला आहे. आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी शेतकऱ्यांना या तलावातील गाळ शेतात टाकून शेती सुपीक करण्याचे आवाहन केले होते तसेच १ हेक्टर किंवा १०० टिप्पर गाळ वाहून नेऊन शेतात टाकणाऱ्यांना गाळमुक्त तलाव गाळयुक्त शेती या योजनेंतर्गत ७ हजारांचा निधी देण-ार असल्याचे आश्वासन दिले होते. या आवाहनाला शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला असून मागील दोन दिवसांपासून जलेश्वर तलावातील गाळ ऊपसा नगर पालिका प्रशासनाने सुरू केला आहे. २० जेसीबीद्वारे तलावातील गाळ उपसण्यात येत असून तो टिप्पर आणि ट्रॅक्टरमध्ये भरला जात आहे. मागील काही दिवस तला-वातील पाणी काढून कयाधू नदीमध्ये सोडण्यात आल्याने आता तलावाचे पात्र रिकामे झाले आहे. सकाळपासून शेतकरी या तलावाच्या पात्रामध्ये टिप्पर आणि ट्रॅक्टर आणून शेतामध्ये गाळ टाकण्यास सुरूवात करीत आहेत. दरम्यान, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अभियंता रत्नाकर अडसिरे, गुत्तेदार मयूर कयाल यांनी नुकतीच तलाव परिसराची पाहणी केली तसेच मुंढे यांनी तलावातील गाळ काढण्यासाठी पुन्हा एकदा शेतकऱ्यांना आव-ाहन केले.

तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यातून नगर पालिकेने जवळप-ास ५५ कोटी रूपयांच्या निधीचा प्रस्ताव पाठवला असून त्यास मंजुरी मिळाल्याची माहीती आ. मुटकुळे यांनी दिली होती. सध्या या तलावाभोवती संरक्षण भिंत आणि चौपदरी रस्त्याचे काम तसेच नाल्यावरील पुलाचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

गाळ उपसा केल्यामुळे या तलावात मोठा पाणीसाठा होणार असून पांडव कालीन तलावात भव्य महादेवा-ची मूर्तीसह सुशोभिकरण आणि बोटींगची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. तलावाचे सुशोभिकरण केल्यानंतर शहरातील सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.

दरम्यान, शनिवारी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी तलावातील गाळ वाहून नेणाऱ्या वाहन धारकांना त्यांची वाहने हळूवारपणे चालविण्याचे आवाहन केले आहे. तलाव परिसर जून्या हिंगोली शहरात असून या भागात छोट्या गल्ली आहेत. वाहने वेगाने चालविल्यास अपघात होऊ नये यासाठी वाहनचालकांना सुचना देण्यात आल्या आहेत.

# भरधाव कार झाडावर आदळून झालेल्या अपघातात दोघे ठार

## हिंगोली ते नर्सी नामदेव रस्त्यावरील घटना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

हिंगोली ते नर्सी नामदेव मार्गावर गिलोरी पाटीजवह भरधाव कार झाडावर आदळून भीषण अपघात झाला. या अपघातात दोघेजण ठार झाले असून तिघे जखमी झाल्याची घटना घडली आहे. शनिवारी पहाटे ४ वाजता हा अपघात झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार उमरखेड तालुक्यातील खरूज येथील वानखेडे कुटुंबीय त्यांच्या पती संभाजीनगर येथे रूग्णालयात उपचारासाठी गेले होते. रात्रीच्या सुमारास ते परत गावी जाण्यासाठी निघाले. हिंगोली ते नर्सी नामदेव मार्गावर गिलोरी पाटीजवळ भरधाव कार रस्त्याच्या खाली असलेल्या झाडावर आदळली. यावेळी मोठा आवाज झाल्याने गावकरी घटनास्थळी धा-वले. या घटनेची माहीती मिळताच नर्सी नामदेव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक अरूण नागरे, जमादार हेमंत दराडे, पांडुरंग डव्हले, प्रभाकर माने, पाचपुते यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता अनिरूध्द वानखेडे आणि अर्चना वानखेडे यांचा जागीच मृत्यु झाल्याचे आढळून आले. याशिवाय सुभाष रामराव वानखेडे, संतोष कैलास वाखखेडे, अनंता गंगाराम चव्हाण हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी नर्सी नामदेव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान उपचारासाठी नांदेड येथे पाठविण्यात आलेल्या तिघांपैकी एकाचा मृत्यु झाल्याचे पोलिसांनी सांगितले परंतु मयताचे नाव समजू शकले नाही.

# आदर्श महाविद्यालयातील सरिता काबरा सेवानिवृत्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ४ मे**

येथील आदर्श महाविद्यालयातील अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट या विभागाच्या शिक्षिका सौ. सरिता काबरा ह्या ३५ वर्ष चार महिने या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्ती सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव, पर्यवेक्षक अनिल शास्त्री, समन्वयक डॉ. संजय कयाल, अधी-क्षक दिलीप दुबे, कैलास डिडाळे, मेजर पंढरीनाथ घुगे, कु. ज्योती शंकपाळे, डॉ. शैलजा वाघ,संदीप बोरकर व महिला प्राध्यापिका आणि स्टाफ उपस्थित होता. म हाविद्यालयात १ जानेवारी १९८९ ला रुजू झाल्यानंतर साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, परीक्षा व नियंत्रण या विविध समितीमध्ये यशस्वी कार्य करणाऱ्या सुपरीचीत सरिता काबरा आज सेवानिवृत्त होत आहेत अशा भावना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव यांनी व्यक्त केल्या.

महाविद्यालयात सेवा करताना मी महत्तम योगदान सेवा देण्याचे प्रयत्न केलेला आहे, माझ्या सेवेत आदर्श शिक्षण संस्था आदर्श महाविद्यालयाचे प्रशासन व माझे सहकारी यांनी मला वेळ-ोवेळी सहकार्य केलं माझ्या कार्याला प्रेरणा दिली त्याबद्दल मनोभावे त्यांचे ऋण व्यक्त करते, असे मनोगत सेवानिवृत्त सरिता काबरा यांनी व्यक्त केले .या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद राजनीकर, अभिजित दादेगावकर, प्रवीण दुबे, बालाजी घुगे, विजय पाठक, जयवंत मुटकुळे, संतोष बिडवई, तालेब पठाण रामसिंग पवार आदींनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– जलेश्वर तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात येणार असून सध्या तलावातील गाळ शेतकरी टिप्पर आणि ट्रॅक्टरमधून नेऊन शेतात टाकत आहेत. सदरील वाहने धारकांना पोलिस प्रशासनाच्यावतीने वाहने सावकाश चालविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. यावेळी गाळ वाहून नेणारे शेतकरी तसेच वाहने दिसत आहेत. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### वाळू चोरीप्रकरणी एक वर्षाची शिक्षा

हिंगोली– हिंगोली ते नर्सी नामदेव मार्गावर कडती फाट्याजवळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि १३ डिसेंबर २०२१ रोजी वाळूची वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले होते. या ट्रॅक्टरमध्ये एक ब्रास वाळू होती. पोलिसांनी ट्रॅक्टर चालक शि भगवान आरगडे रा कंकरवाडी, ता रिसोड ह मु जवळा बुद्रुक जि हिंगोली याच्याकडे कागदपत्राची मागणी केली होती. मात्र त्याच्याकडे कुठल्याही प्रकारची कागदपत्रे आढळून आली नाहीत. त्यामुळे जमादार किशोर सावंत यांनी दिलेल्या तक्रारीवरून नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी न्यायालयात दोष-ारोप पत्र पोलिसांनी सादर केले. सदर प्रकरण न्यायधीश आय जे ठाकरे यांच्या न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. यावेळी एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी शिव भगवान आरगडे यास एक वर्षाची साधी कैद व २ हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.. प्रकरणात सरकार पक्षातर्फे विशेष सहायक सरकारी वकील अॅड शारदा भट्ट यांनी काम पाहीले. त्यांना तपास अधिकारी व्ही बी कुटे, पैरवी अधिकारी सपोउपनि यलदरे यांनी सहकार्य केले.

### स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप सप्ताह



हिंगोली– शहरातील नाईक नगर भागातील स्वामी समर्थ केंद्रामध्ये शुक्रवारपासून अखंड नाम जप सप्ताहाला सुरूवात झाली आहे. येथील स्वामी समर्थ केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. अखंड नाम जप सप्ताहाला मोठ्या संख्येने महिला आणि पुरूषांनी सहभाग घेतला आहे.

### श्री शिवेश्वर बँकेच्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटन

वसमत– भारतीय रिझर्व बँक, सहकार खाते महाराष्ट्र शासन यांच्या निकषाची अमलबजावणी करण्याकरीता श्री शिवेश्वर नागरी सहकारी बँकेच्या मुख्य शाखेचे विभाजन करून, मुख्य कार्यालय व मुख्य शाखा असे विभाजन करण्यात आले. या नवनिर्मित मुख्य कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार व सहकारमंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी माजी आम दार व सहकारमंत्री जयप्रकाश मुंदडा, आमदार राजू नवघरे, भाजपच्या महिला जिल्हा अध्यक्ष सौ. उज्वलाताई तांभाळे, बँकेचे अध्यक्ष शिवदासजी बोड्डेवार, उपाध्यक्ष वसंतराव चेपूरवार आणि सर्व संचालक, सभासद, खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन बँकेचे सरव्यवस्थापक संजीवकुमार बेंडके यांनी केले. या प्रसंगी बँकेचे सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर कवटे, किशन पानधोंडे, संदिप पाटिल, रघूत्तम पांडे, शिवानंद सोनटक्के आदींची उपस्थिती होती.

# महावितरण कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ४ मे**

येथील खतीब कॉलनी, हुतात्मा स्मारक, जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, हिंगोली ते परभणी रोडवरील विद्युत खांब महामार्गावर असल्याने अपघ-ातास कारणीभूत ठरत असून या मुळे भविष्यात मोठी जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याबाबत तक्रार करण्यात आली असून तत्काळ हे विद्युत खांब न हटविल्यास महावितरण कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तक्रारीत असे नमूद केले आहे की सदर मार्गावर महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा अस-लेले पोल हे महामार्गावरचआहेत त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे, अनेक वेळा या पोलमुळे अपघातही घडत आहेत. सदर मार्गावर असलेले विद्युत खांब त्वरीत हटविण्यात यावेत. यापूर्वीही निवेदन देण्यात आले होते. सदर मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे अधीक्षक अभियंता कार्यालय हिंगोली महाराष्ट्र विद्युत महामंडळ यांच्याकडे तक्रार करून सदर विद्युत खांब हे त्वरित हटवण्याची मागणी करण्यात आली आहे. म ागणी मंजूर न झाल्यास महावितरण कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर म. सिद्दीक खालेद इनामदार यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजीमंडईत अतिक्रमणामुळे वाहनांची कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

शहरातील भाजीमंडईमध्ये अतिक्रमणे वाढल्यामुळे तसेच प्रवेशद्वाराजवळ हातगाडे आणि इतर दुकाने थाटल्यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहनांची कोंडी होत आहे. नगर पालिकेच्यावतीने शहरातील अतिक्रमणे हटविण्यात येत असून रस्ते मोकळा श्वास घेत आहेत. मात्र दुसरीकडे येथील भाजीमंडईमध्ये नगर पालिकेने नेमुन दिलेल्या गाळ्यात किंवा भाजीविक्रेत्यांना बांधून दिलेल्या जागेवर भाजीविक्रेते, फळविक्रेते बसत नसून रस्त्यावर बसत आ-हेत. त्यामुळे भाजीमंडईत चालणे कठीण झाले आहे. अतिक्रमणांवर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

# अनुराधा पतसंस्थेच्या अध्यक्षासह संचालक मंडळावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**

शहरातील ठेवीदारांची ६.२७ कोटी रूपयांची फसवणुक केल्याच्या आरोपावरून अन-ुराधा पतसंस्थेच्या अध्यक्षासह संचाल मंडळ, कर्मचारी अशा ११ जणांवर शहर पोलिस ठाण्यात शुक्रवारी उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.

हिंगोली येथे स्थापन झालेल्या अनुराधा पतसंस्थेच्या अध्यक्ष व संचालक मंडळाने दि २४ डिसेंबर २०१९ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत ठेवीदारांना फिक्स डीपॉझिट व ईतर गुंतवणुकीवर इतर संस्थेच्या तुलनेत जास्तीचे म्हणजेच १० ते १२ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्यामुळे ४ हजार ३८ ठेवीदारांनी त्यांची ६.२७ कोटी रूपयांची रक्कम संस्थेच्या विविध प्रकारच्या ठेवीमध्ये गुंतवली होती.

मात्र ठेवीदारांच्या रकमेचा अपहार करण्याच्या उद्देशाने आरोपीतांनी बनावट ठराव व बनावट कर्ज प्रकरण तयार करून त्यावर बनावट स्वाक्षऱ्या करून त्याआधारे संस्थेची मुदत ठेवीची रक्कम तारण कर्जाद्वारे परस्पर उचलुन अपहार केला. सदर बाब लेखा परिक्षणात स्पष्ट झाली आहे.

याप्रकरणी अनिल पारप्पा बंधू यांनी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक कांबळे रा गोपाल टॉकीजजवळ वाशिम, ह. मु, तापडीया इस्टेट हिंगोली, सचिव मोहन मनीराम सोनटक्के रा जवाहर कॉलनी वाशिम, संचालीका अनुराधा वामनराव कांबळे, सीमा अशोक कांबळे रा, वाशिम, बाजीराव शैकू, मनिषा मनोज डोळसकर उर्फ मनीषा पिता सुभाष कल्याणकर, मोहम्मद साजीद अब्दुल खदीर रा हिंगोली, तेजस्वीता राजेंद्र शेगोकर रा वाशिम, व्यवस्थापक प्रदीप पत्की, मोतीराम जगताप, शुभम घाटोळ रा हिंगोली यांच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे निरीक्षक एन बी काशीकर पुढील तपास करीत आहेत.

# हिंगोली जिजाऊ ब्रिगेडची जिल्हा व शहर कार्यकारणीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ मे**



जिजाऊ ब्रिगेड हिंगोली जिल्हा कार्यकारणी जाहीर झाली असून जिल्हाध्यक्षपदी साधना हेंबाडे, महासचिवपदी प्रा. सीमा वडदकर तर सचिवपदी वर्षा सरनाईक यांची निवड करण्यात आली आहे.

सरस्वती नगर येथे जिजाऊ ब्रिगेडची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये कार्यकारणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. उर्वरित कार्यकारणीमध्ये शहराध्यक्ष शितल सा-वके, सचिव सरस्वती कोरडे यांची निवड करण्यात आली. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय संघटक सुनिताताई मुळे व विभागीय अध्यक्ष राजश्रीताई क्षिरसागर, डॉ. शितल कल्याणकर प्रदेश संघटक; माजी जिल्हाध्यक्ष व मार्गदर्शक कांताताई कल्याणकर उपस्थित होत्या. जिल्हा उपाध्यक्ष वैशाली डोखळे, रेखा पडोळे, सुवर्णा बोरकर, वृशाली पाटील, जया मेटकर, तेजस्विनी टाकळगव्हनकर, सलोखा इंगोले, राजश्री सोळंके यांची निवड करण्यात आली. सहसचिव अरुणा अंभोरे, स्मिता वारे, शारदा कल्याणकर यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी अनिता कावरखे तर सहकार्याध्यक्ष सविता सरनाईक, जया सावके, ज्योती महाले, वंचमा आवचार यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा संघटकपदी वर्षा ढोकर पाटील, वर्षा सरणाईक तर सहसंघटक म्हणून जया पवार मंगल पोहकर यांचे नियुक्ती करण्यात आली जिल्हासन्मान्वयकपदी लक्ष्मी जगताप, सहसमन्वयक पदी शोभा वाबळे यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा प्रवक्तापदी सुषमा देशमुख व जिल्हा प्रचार व प्रसार माध्यमपदी अरुणा ठाकरे व अर्चना पवार यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्यपदी स्मिता दळवी, उमा जगताप, मिरा कापसे, छाया मुधोळ, जया मगर, सुनिता भालेराव, अबोली भालेराव, सविता खडसे, सुरेखा जाधव, वैशाली गोटे, अरुणा टाकळगावकर, शिल्पा भालेराव, कल्पना मईंग, सुजाता जोजार कल्याणी शिंदे, माधुरी माने यांची नियुक्ती करण्यात आली.

हिंगोली शहर कार्यकारणीमध्ये उपाध्यक्ष वसुंधरा सवनेकर, सुनीता सवनेकर, सहसचिव संगीता वायचाळ, माधुरी माने, कोषाध्यक्ष श्रुतिका देशम ुख, सहकोशाध्यक्ष वैशाली राऊत, पार्वती घ्यार, प्रवक्ता अर्चना जाधव सहप्रवक्ता सुजाता जोजार, कार्याध्यक्ष गायत्री मुळे, संघटक सुनिता कव्हर, सदस्य सगुना सूर्यवंशी,राणी पाटील, स्नेहल घुटे, शकुंतला सावंत, संगीता पोळ वरील सर्व सदस्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जिजाऊ ब्रिगेडची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

जिजाऊ ब्रिगेड ही महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक व कौटुंबिक समस्या सोडविणारे महिलांचे राष्ट्रीय पातळीवरील भक्कम आणि मोठी संघटना आहे महिलांमधील अंधश्रद्धा कालबाह्य रूढी परंपरा सोडविण्यासाठी जिजाऊ ब्रिगेडने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. गेल्या काही वर्षात जिजाऊ ब्रिगेडने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतलेले सामाजिक उपक्रम अधिवेशन तसेच ज्वलंत प्रश्नावर केलेले आंदोलन यामुळे जिजाऊ ब्रिगेड एका उंचीवर गेली आहे अनेक सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलनात्मक भूमिका घेत महिलांना न्याय व हक्क मिळवून दिला आहे. त्यामुळे जिजाऊ ब्रिगेडकडे जास्तीत जास्त महिला जोडल्या जात आहेत. सम ाजोपयोगी कार्यासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी कृतीशील असणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे उद्घाटन

**परंडा, दि.४ मे -**

आरोग्य मित्र डॉ. राहुल भिमराव घुले आणि डॉ. अमोल भिमराव घुले यांच्या माध्यमातून आज अखंड मराठवाड्याचे आराध्य दैवत श्री क्षेत्र काळभैरवनाथ सोनारी (ता.परंडा) येथे यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांच्या सेवेसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन पिर महंत योगी शामनाथजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकडो गरजू नागरिकांनी या शिबिराच्या माध्यमातून आपल्या विविध शारीरिक चाचण्या करून घेतल्या. हे शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. उत्रेश्वर मुंडे, सर्कल प्रमुख मिनाक्षी काळे, सुशीला आडसुळ, हरीश गाढवे, वभागीय कार्यालय प्रमुख सचिन जाधवर, सोनम बनसोडे, सुरज बांगर यांनी अथक परिश्रम घेतले. डॉ. घुले यांनी आता बरेच रुग्णावर स्वखर्चाने औषधोपचार केले आहेत व यापुढे करणार असल्याचा त्याचा मनोदय आहे.



### तुळजापूरचे सुर्यवंशी कुंटुंब रंगलय प्रचारात

**तुळजापूर, दि.४ मे -**

तुळजापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष श्रीकृष्ण सुर्यवंशी व त्यांच्या सौभाग्यवती संपदा प्रतिष्ठान अध्यक्षा मीरा श्रीकृष्ण सुर्यवंशी आपल्या दोन मुलांसह तुळजापूर शहरात घरोघर फिरून महायुती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ घरोघर फिरुन अर्चनाताई पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन करीत आहे. यात सुर्यवंशी परिवारातील पती श्रीकृष्ण, पत्नी मीरा व त्यांचा मुलगा हर्षवर्धन, मुलगी संपदा सकाळी प्रचारासाठी घराबाहेर पडुन सायंकाळी घरी येत आहे.



### माजी सैनिकांचा भाजपात प्रवेश

**धाराशिव, दि.४ मे -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर व आपल्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन माजी सैनिकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी सैनिक प्रभाकर हाके, मधुकर वाघमोडे, प्रमोद जाधव, नारायण जाधव, पोपटराव जाधव, शिवराम पारेकर, अश्रू लोकरे, शिवाजीराव चव्हाण, लिंबाजी पौळ, साहेबराव झोरे, शिवाजी पेंडपाले, बाळराजे पाटोळे, शहाजी पगारे, प्रभाकर अवताडे, बाळासाहेब जाधव, पांडुरंग खोसे, मारुती माने यांचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना प्रचंड मताने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे या सर्वांनी सांगितले. यावेळी भूम तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी संतोष सुपेकर, महादेव वडेकर, बाळासाहेब शिरसागर, दिनेश पौळ, बाबा वीर, प्रदीप साठे, शांतीराज बोराडे, अमोल लोंढे, दयानंद बोराडे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### संस्कार भारतीची सर्वसाधारण सभा संपन्न

**धाराशिव, दि.४ मे -**

शहरातील शिवशंभू पंढरी वसाहतीतील सार्थसत्य येथे ८ व ९ जून २०२४ रोजी देव गिरी प्रांत संस्कार भारती समिती दोन दिवशीय सर्वसाधारण सभा ग्रीन लॅन्ड शाळेत संपन्न होणार असून यासाठी पूर्वतयारी नियोजन बैठकीस मार्गदर्शन करण्यास देवगिरी प्रांत संस्कार भारतीचे महामंत्री डॉ. जगदीश देशमुख यांनी केले. सदर सर्वसाधारण बैठकीस प्रांतातील २० समितीचे एकूण १५० ते २०० कला साधक उपस्थित राहतील असे देशमुख यांनी सांगितले. विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर भगवत गीता देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी देवगिरी प्रांत लोक कला विधाप्रमुख डॉ. सतिश महामुनी, प्रांत चित्रकला विधा प्रमुख कलाध्यापक शेषनाथ वाघ, नांदेड समिती जिल्हासचि व अंजली देशमुख, धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष अनिल ढगे, जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, जिल्हासचिव प्रभाकर चोराखळीकर, जिल्हा संगीत विधा प्रमुख सुरेश वाघमारे, कलासाधक अनिल मालखरे, महादेव केसकर, सुधीर पवार, सार्थकी वाघ उपस्थित होते. बंगरुळ येथील कलासाधक संगमात विमोचित पद्मश्री बाबा योगेंद्र व राष्ट्रीय सचिव स्व. अमरचंद्र यांच्या चरित्र पुस्तकाचे वितरण महामंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.



### महेंद्र शिंदे यांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

**धाराशिव, दि.४ मे -**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याला प्रेरित होऊन भाजपाचे माजी विद्यार्थी जिल्हाध्यक्ष महेंद्र शिंदे यांनी खासदारसंपर्क कार्यालय येथे आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख सोमनाथ गुरव, संदीप शिंदे, जगदीश शिंदे, बाबा चव्हाण, काकासाहेब शिनगारे आदींसह शिवसैनिक, कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकांना किरकोळ समजणाऱ्यांना मतासाठी झोळी पसरावी लागत आहे : ओमराजे निंबाळकर



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ मे -**

फोनवरुन काम केल्यानंतर ही कामे, जे फोन करतात त्यांच्यासह खासदार देखील किरकोळ म्हणणाऱ्या विरोधक आता त्याच किरकोळ लोकांकडे मताची झोळी पसरताना दिसत आहे. ते किरकोळ आहेत, तर मग आता मतासाठी का त्यांच्या पाया पडत आहात असा सवाल खासदार ओमराजे निंबाळकर यांनी विरोधकांना केला आहे. काटगाव (ता.तुळजापुर) येथे आयोजीत सभेत ओमराजे बोलत होते.

ओमराजे म्हणाले की, सर्वसामान्य लोकांचे सामान्य कामे माझ्याकडुन झाली. हे पाहुन कामे किरकोळ व माणसही किरकोळ असे समजणारी विरोधकाची टोळी आता त्याच सामान्य माणसाच्या मतासाठी मताचा जोगवा मागताना गावोगावी दिसत आहेत. ज्या सामान्य लोकांच्या तुम्ही किरकोळ म्हणुन अपमान केला ती जनता तुम्हाला प्रतिसाद देत नसल्याने तुमच्या पायाखालची वाळु सरकली आहे. फक्त निवडणुकीपुरता विकास करु म्हणणाऱ्या विरोधकांचा खरा चेहरा आता लोकासमोर आलेला आहे. ओमराजे खासदार म्हणुन तुमच्या पाच वर्ष संपर्कात राहिला आहे. फक्त निवडणुकीपुरता मी तुमच्यासमोर आलो असतो तर मला मत मागायचा सुध्दा अधिकार राहिला नसता. हक्काने मी तुम्हाला मतदान मागत आहेत. गावागावातुन लोकांना मताची तर हमी दिलीच आहे पण सोबत पैसा देऊन त्यानी मला प्रेम दिले आहे. स्वकष्टाने कमवुन दिलेला हा पैसा खोका पेटीच्या किंमतीपेक्षा कित्येक पट्टीने अधिक असल्याचे ओमराजे म्हणाले.

निवडणुकपुरता जुगाड करुन कशीही उमेदवारी आपल्या पदरात पाडुन घेणारी ही मंडळी त्यांच्या पक्षाशीही इमान राखत नाही ते जनतेशी कशी इमानदार राहिल असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला.

आम्ही कसेही वागु आणि जनतेनी आमच्या मागे यावे अशी अत्यंत स्वार्थी भावना ठेवणाऱ्यांना जनता मतदानरुपी शक्ती दाखवुन देतील असा विश्वास ओमराजे यांनी व्यक्त केला.

# महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी मोदींचे पाठबळ : डॉ. सरोजनी राऊत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात मागील दहा वर्षात रस्ते वीज पाणी शिक्षण आरोग्य यांच्या माध्यमातून सर्वांगीण प्रगती झाली असून भारतीयांचे जीवनमान सुधारण्यासाठी मोदींनी केलेले प्रयत्न आणि त्यामुळे वाढलेली विकासाची गती यासोबतच महिलांच्या सक्षमीकरणातून आत्मनिर्भरतेकडे होत असलेल्या वाटचालीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा भारताचे नेतृत्व करण्याची संधी देण्याची गरज आहे. त्यासाठी उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना निवडून देवून मोदींना पाठबळ द्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सरोजनी राऊत यांनी केले.

त्या शिराढोण येथे महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होत्या. यावेळी या जाहीर सभेस पालकमंत्री प्राध्यापक डॉ. तानाजीराव सावंत, आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजपाचे कळंब तालुकाध्यक्ष अजित पिंगळे, रामहरी शिंदे, पंडित टेकाळे, शिराढोणच्या सरपंच म्हेत्रे किरण, पाटील नितीन, पाटील पद्माकर आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना डॉ. राऊत पुढे म्हणाल्या की, महिलांमधील असलेली नेतृत्व करण्याची ताकद ओळखून महिलांचे खंबीर नेतृत्व पुढे आणण्यासाठी मोदींनी महिलांना विशेष आरक्षण वाढवण्याचे ठरवले. त्यातूनच अर्चनाताईंना लोकसभेसाठी उमेदवारी मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आपल्या जिल्ह्याची ताकद उभा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व क्षेत्रात भरीव काम केले आहे.

देशाच्या सेवेची संधी मिळाल्यानंतर त्यांनी निस्वार्थ भावनेने मागील दहा वर्षांपासून देशात अमुलाग्र परिवर्तन करून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत देशाचे नाव उंचावणाऱ्या नरेंद्र मोदींच्या या राष्ट्र कार्याला पाठिंबा देणे हे आपले अर्चनाताईंना मत देऊन कर्तव्य आहे, असे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.

# खामसवाडीच्या जि.प. प्राथमिक शाळेचे उत्तुंग यश

## प्रज्ञा परीक्षेत आशिष बंडगर राज्यात दुसरा..

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.४ मे -**



कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाल्याने जिल्ह्यात या शाळेने शैक्षणिक दबदबा कायम ठेवला आहे.

या शाळेतील पहिलीचा विद्यार्थी आशिष शिवाजी बंडगर हा प्रज्ञा परीक्षेत राज्यातुन दुसरा आला आहे. याच वर्गातील शर्वरी माळी जिल्ह्यात तिसरी तर ओम झोरी जिल्ह्यात चौथा आलेले आहेत.

तसेच दुसरी वर्गातील विदयार्थीनी अक्षता नितीन बाबर केंद्रात प्रथम तर आकांक्षा काकासाहेब बाबर ही केंद्रात पाचवी आली आहे. तिसरी वर्गातील विद्यार्थीनी रुधिरा गोपाळ शेळके ही केंद्रात तेरावी आली आहे. इयत्ता चौथीच्या वर्गातील स्वराली भागवत शेळके केंद्रात द्वितीय, आरव अमोल शेळके केंद्रात त्रितीय, अमृता अमोल रोहिले केंद्रात सहावी तर प्रिया दिनेश शेळके केंद्रात अकरावी आली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका कोळी टी.बी. मार्गदर्शक शिक्षक मोरे एस.बी, बाबर ए.बी. शेळके, एन.व्ही, मुंडे व्ही.बी, रोहिणी माने आर.बी. बाकले, एस.बी. कऱ्हाळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्यात व जिल्ह्यात यशस्वीपणे शैक्षणिक क्षेत्रात भरारी मारल्याने सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

गावचे सरपंच अमोल पाटील, भाजपा धाराशिव किसान मोर्चाचे अध्यक्ष संजय पाटील, काँग्रेसचे युवा नेते अशोक शेळके, शिक्षिका काजल यादव, शेळके, गावकऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून गोसंवर्धन करा : शेखर मुंदडा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मे -**

महाराष्ट्र शासन गोशाळा व गोसंगोपन या दोन्ही विषयांवर गोसेवा आयोगामार्फत विविध योजना राबवत असून गोशाळा संचालकांनी आपल्या संस्था नोंदणीकृत करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून गोसंवर्धन करावे, असे आवाहन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी केले.

धाराशिव येथील अन्नपूर्णा बहुउद्देशीय संस्थेने जिल्ह्यातील गोसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांची जिल्हास्तरीय बैठक आयोजित केली होती. या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंदिर ट्रस्टचे श्यामसुंदर बांगड, अशोक मंत्री, माहेश्वरी जिल्हा सभेचे श्रीकिशन भन्साळी, मदनलाल मिनियार, जुगल लोया, राजस्थानी सेवा संघाचे अतुल अजमेरा, मनोज कोचेटा, जगदीश मोदाणी, महेश मिनियार, हनुमानदास भराडीया उपस्थित होते.



पुढे बोलताना मुंदडा म्हणाले की, गोसेवा आयोग जी-१० संकल्पना राबवत असून या १० बिंदूमध्ये गोसंगोपन, गोसंवर्धन, गोसंरक्षण या व इतर विशिष्ट विषयांचा समावेश आहे.

याचा सर्व गोशाळा संचालकांनी लाभ घेणे आवश्यक आहे. या संस्थेमार्फत चालवल्या जाणार्या शेठ गोविंद खटोड भाकड गायींच्या गोशाळेला मुंदडा यांनी भेट देवून गोशाळेचे उत्कृष्ट प्रकारे गोसंवर्धन केल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष अतुल अजमेरा व इतर सदस्यांनी त्यांना याबाबत माहिती दिली.

यावेळी जिल्हा माहेश्वरी सभा, श्री बालाजी मंदिर ट्रस्ट व राजस्थानी सेवा संघ या संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मदनलाल मिनियार यांनी तर आभार संजय मंत्री यांनी व्यक्त केले.

### मतदान जनजागृतीपर चित्रप्रदर्शनीचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर - भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणा-या केन्द्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय-छत्रपती संभाजीनगर द्वारा जिल्हा प्रशासन, जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व दक्षिण मध्य रेल्वे यांच्या सहयोगाने छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन येथे मतदान जनजागृती वर तीन दिवसीय चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. हि चित्रप्रदर्शनी दिनांक ०६ ते ०८ मे, २०२४ (सोमवार ते बुधवार) या कालावधीत सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०८.०० वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी मोफत खुली राहील. या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन मा. जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांच्या हस्ते दिनांक ०६ मे २०२४ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. या लोकसभा मतदान उत्सवात जास्तीत जास्त मतदान होण्याच्या उद्देशाने ह्या मतदान जनजागृतीपर चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या चित्रप्रदर्शनीला मोठ्या संख्येने भेट देऊन हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केन्द्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय-छत्रपती संभाजीनगर तर्फे करण्यात आले आहे.


**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate** : **SHRI RAOSAHEB DADARAO DANVE, Shivaji Nagar, New Bhokardan, Tah. Bhokardan, Dist. Jalna, Maharashtra**

**Name of political party** : **Bharatiya Janata Party**

**Name of Election** : **House of People (Lok Sabha Election - 2024)**

***Name of Constituency** : **18 - Jalna Parliamentary Constituency**

**I SHRI RAOSAHEB DADARAO DANVE**, a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of acts concerned and brief description of offences |
| 1. | Not Applicable | NC/587/2016 28/12/2016 | Not Applicable | Section 171(B) Indian Penal Code & Section 22(1) Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act 1965. As per Report gratification offered to voters to cast vote to a particular candidate. |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court and date(s) of order(s) | Case No. and dated | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
| 1. | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

Name & Signature of Candidate
**(SHRI RAOSAHEB DADARAO DANVE)**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अपघात झाल्याचे दाखवुन केलेल्या खुनाची उकल केज पोलीसांची उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ एप्रिल**

दिनांक २८/०३/२०२४ रोजी सकाळी साडेसात वाजता पिंपळगाव ते विडा रोडवर पिंपळगाव शिवारात रस्त्यावर एक अनोळखी व्यक्ती मृत आवस्थेत पडलेली असले बाबत माहिती मिळाल्याने मा. पोनि महाजन साहेब यांच्या आदेशाने पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोह/१०५१ राजु वंजारे व पोअं/२१७२ महादेव बहिरवाळ असे घटनस्थळी रवाना झाले. सदर ठिकाणी रस्त्यावर एक पुरुष जातीचे अनोळखी बेवारस प्रेत मिळुन आल्याने पंचनामा करण्यात आला. सदर मयताचा अपघात झाला असल्याचे प्रथमदर्शनी वाटत होते. त्यादृष्टीने अनोळखी ईसमाचा चेहरा अपघातामध्ये विदृप झालेला होता. २४ तासांच्या आतमध्ये मयत ईसमाची ओळख पटविण्यात केज पोलीसांना यश आले. केज पोलीसांनी सदर मयताचा उपजिल्हा रुग्नालय, केज येथे शवविच्छेदन केले. दिनांक ३०/०३/२०२४ रोजी महिला नामे सखुबाई दत्तात्रय केदार रा. गप्पेवाडी ता. केज जि. बीड यांनी सदर अनोळखी प्रेताची ओळख पटवून तिच्या पतीचा घातपात झाला असल्याची दाट शक्यता व्यक्त केल्याचे तिच्या फिर्यादी वरुन केज पोलीस स्टेशन येथे कलम ३०२, ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्याचा तपास पोउपनि आनंद शिंदे हे करीत होते.



घटनास्थळी कोणताही पुरावा न ठेवता अपघात झाल्याचे भासवुन खुन झाला असल्याने यातील आरोपीविरुध्द पुराव्याची साखळी निर्माण करण्यासाठी प्रयत्नांची परिकष्ठा करण्याचे आव्हाण केज पोलीसांपुढे निर्माण झाले होते. या करीला पोलीसांनी दोन विशेष पथके स्थापन करुन आजुबाजुच्या परिसरातील हॉटेल, लॉजेस, दारुची दुकाने, गॅरेज व गोपनिय साक्षीदारांच्या आधारे आणि तांत्रिक पध्दतीने शोध घेवुन आरोपी नामे विकास मधुकर केदार, मुख्य आरोपी विलास उत्तम केदार व परमेश्वर धोंडीबा चौरे यांना धाराशिव जिल्ह्यातून ताब्यात घेवुन अटक करण्यात आले. त्यामध्ये अनैतिक संबंधाच्या कारणावरुन खुन झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये आरोपीतांनी मागे कोणताही पुरावा न ठेवता अपघात झाल्याचे भासवुन थंड डोक्याने खुन केल्याचे केज पोलीसांनी उघड केले. या गुन्ह्यामध्ये आरोपीतांनी गुन्ह्यात वापरलेला ट्रक ताब्यात घेत असुन पोलीसांनी आरोपीतांना कोटांत हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांची दिनांक ०७/०५/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

सदर गुन्ह्यामध्ये मा. पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकुर साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग केज कमलेश मीना साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोउपनि आनंद शिंदे, पोह/राजु वंजारे, पोना/अनिल मंदे, पोअं/महादेव बहिरवाळ, पोअं/संतोष गित्ते व पोअं/प्रकाश मुडे यांनी महत्वाची कामगिरी केलेली आहे

# जिल्ह्यातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून MPD कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. या पार्श्वभुमीवर पो.नि.शितलकुमार बल्लाळ पोलीस ठाणे बीड शहर यांनी दिनांक ०८.०४.२०२४ रोजी इसम नामे शेख अखिल शेख हसिनोद्दीन वय ३१ वर्षे रा. तेलगांव नाका, पेठ बीड ता. जि. बीड याचे विरुद्ध MPD कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पोलीस ठाणे बीड शहर, शिवाजीनगर येथे जबरी चोरी करणे, चोरी करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, अवैदय शस्त्रबाळगणे, रस्ता आडविणे वगैरे स्वरुपाचे ०७ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०५ गुन्हे न्यायप्रविष्ठ व ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहेत, तसेच नमुद इसमावर त्याने आपली वर्तनुक सुधारावी म्हणुन यापुर्वी CrPC कलम ११० प्रमाणे दिनांक ०५/०६/२०२३ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालुच ठेवून होता. त्याची बीड शहरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवुन दहशत निर्माण करुन व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता.

सदर प्रकरणात दिपा मघोळ मुंडे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ०२.०५.२०२४ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए.कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छ.संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बोड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.स्टे. बीड शहर व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. त्यानंतर पो.नि.संतोष साबळे यांचे सुचनेवरुन पोउपनि श्रीराम खटावकर व त्यांचे टीमने सदर प्रस्तावित स्थानबद्ध इसमास वि. ०३.०५.२४ रोजी २०.३० वा. ताब्यात घेवुन पो.स्टे. बीड शहर येथे हजर केले त्यानंतर पो. नि. बीड शहर यांनी दिनांक ०३.०५.२०२४ रोजी २२.२१ वा. सदर इसमास कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्मुल कारागृह, छ. संभाजीनगर येथे दिनांक ०४.०५.२०२४ रोजी ०३.३० वा. हजर करुन स्थानबध्द केले आहे.

# बीड शहरातील परशुराम जन्मोत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्ष शुभम कायदे, उपाध्यक्ष अक्षय देशपांडे, सचिव राहूल देशमुख यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**



प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव वैशाख शु.३ शुक्रवार दि.१० में २०२४ रोजी संपुर्ण देशभर उत्साहात साजरा करण्यात येत असून बीड शहरात यानिमित्ताने अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, कन्वं परिषद बीडच्या प्रमुख पदाधिकारी, सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत परशुराम जन्मोत्सव समिती बीडच्या अध्यक्षपदी शुभम कायदे, उपाध्यक्ष अक्षय देशपांडे, सचिव राहूल देशमुख यांच्यासह कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त शुक्रवार दि.१० मे रोजी भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे तरी परशुराम जन्मोत्सव समिती बीडच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बीड शहरातील महिला, पुरुष, युवक, युवतीसह जेष्ठ नागरिक, भावीकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अबकी बार मोदी-शहा की महागाई सरकार हद्दपार-जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ एप्रिल**

उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी महाविकास आघाडी बीड लोकसभा उमेदवार मा बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चिंचोली माळी सर्कल मध्ये बैठकाचा झंझावात प्रचारात तालुका प्रमुख अशोक जाधव युवा सेना तालुका प्रमुख किशोर घूले तालुका समन्वयक लक्ष्मन गलांडे सह शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते यावेळी बोलतांना उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी म्हटले की कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील उमेदवार म्हणून बजरंग बप्पा सोनवणे यांना पसंती मिळत आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी म्हटले व बजरंग बप्पा सोनवणे यांची मराठा, धनगर, मुस्लिम आरक्षणासह संविधान वाचविण्याची भूमिका, प्रत्येक तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी नवीन प्रकल्प आणणे, रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करणे ही कामे प्राधान्याने करण्याचे त्यांचे धोरण, कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, हरबरा या पिकांवरील निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना हमीभाव व शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आवाज उठवून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हा त्यांचा ध्यास असल्याची भूमिका मतदारांसमोर प्रचारात शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे मांडत आहेत. तर रत्नाकर शिंदे बोलताना असे सुध्दा म्हटले की राज्याच्या आणि देशाच्या विकासात शरदचंद्र पवार यांचा असलेला सिंहाचा वाटा, देशात सर्वांना समान संधी व समान न्याय



मिळावा म्हणून काँग्रेस पक्षाची भूमिका तर राज्यात अडीच वर्षाच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना सारख्या महामारीत हाताळलेला परिस्थिती. या गोष्टीचा विचार करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी मतदार उभे राहून प्रचंड बहुमताने मानुसधरी तुतारी समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने बजरंग सोनवणे यांना निवडून द्यावे असे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी प्राचार दौऱ्यात म्हटले आहे.

# इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कुलचे शिष्यवृत्ती परिक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ एप्रिल**

केज तालुक्यातील युसुफ वडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परिक्षेत बसलेले पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील युसुफ वडगाव सारख्या ग्रामीण भागात उच्च दर्जाचे शिक्षण देणारी संस्था म्हणून नावारूपाला आलेल्या इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले, तसेच शाळेतील एम.टी.एस परीक्षेस बसलेले सर्व विद्यार्थी १००% उत्तीर्ण झाले.तसेच सैनिकी स्कूल परीक्षेत हि दोन विदयार्थी उत्तीर्ण झाले, अशा प्रकारे शैक्षणीक वर्ष २०२३-२४ मध्ये विवीध स्पर्धा परीक्षे मध्ये शाळेने घवघवीत यश संपादन केले, त्याबद्दल पालक समाधान व्यक्त करत असून शाळेचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे, की ग्रामीण भागात उच्च प्रतीचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यानं मध्ये स्पर्धा परिक्षे बाबत आवड निर्माण करण्याचे काम शाळा करत आहे, ग्रामीण भागात सुद्धा शाळा चांगली आसेल तर विदयार्थी घडतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे इरा इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल युसुफ राम वडगांव गुणवत्ता पूर्ण, परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी नावाजलेली शाळा असून आजच्या स्पर्धेच्या युगात आपला विदयार्थी टिकला तर पाहिजे, पण त्याने यश हि संपादन केले पाहिजे यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत असतात.

# मी जिवंत असेपर्यंत तुम्हाला ऊसाची अडचण येऊ देणार नाही -सोनवणे

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बप्पांचे आश्वासन; गावोगावी जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.४ एप्रिल**

परळी तालुक्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. येथील साखर कारखाने बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कारखाने बंद पाडलेल्या नेत्यांनी मागील वर्षीचे शेतकऱ्यांचे पैसे दिले नाहीत याचे खरंच आश्चर्य वाटते. यापुढे अशी हेळसांड ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होणार नाही. मी जिवंत असेपर्यंत गावागावातील प्रत्येक शेतकऱ्याचा ऊस माझ्या कारखान्याला मी घेऊन जाईल, कारखान्याची गाळप क्षमता ही मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे त्यामुळे भविष्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कुठल्याही अडचणीला सामोरे जावे लागणार नाही असे



आश्वासन महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिले. परळी विधानसभा मतदारसंघात बजरंग बप्पा सोनवणे यांनी गाव भेट दौरा केला. या दौऱ्यात आणि गावांना भेटी देऊन त्या ठिकाणी कॉर्नर बैठकाही घेतल्या. या दौऱ्यात त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, सौ.सुदामतीताई गुट्टे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, शेकापचे कालिदास आपेट, कॉ.अजय बुरांडे, शिवसेनेचे भोजराज पालीवाल यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष तथा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शुक्रवारी परळी तालुक्यात गावभेट दौरा केला. मतदार संघातील पिंपरी (बु), गोवर्धन, हिवरा, जळगव्हाण, रामेवाडी, पोहनेर, तेलसमुख, ममदापूर, कौडगाव हुडा, कौडगाव घोडा, साबळे कौडगाव, कानडी, गाढे पिंपळगाव, सेलू, भीलेगाव, वाघाळा, मोहा, करेवडी आदी गावांचा प्रचार दौरा केला. या दौऱ्यात विविध गावांत झालेल्या बैठकांमध्ये त्यांनी विरोधकांवर चांगलाच हल्ला चढवला. ते म्हणाले की, विरोधकांनी विकासाचे राजकारण करावे, जिल्ह्याच्या उत्कर्षासाठी काय करणार? ते जनतेला सांगावे. मागील अनेक वर्षांपासून त्यांच्या हातात सत्ता आहे. तेच आमदार, तेच खासदार आणि मंत्री आहेत. मात्र असे असूनही जिल्ह्याचा विकास होऊ शकला नाही हे आपले दुर्दैव आहे. म्हणूनच जनता आता कंटाळली असून, परिवर्तनाच्या मानसिकतेत आहे. भाजपाच्या नेत्यांनी आणि आताच्या उमेदवारांनी एवढाच जर विकास केला तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव का झाला? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आजपर्यंत तुमच्या मनावर ऐकलंय, आता माझ्या मनावर एकदा ऐका. परळीच्या नेत्यांना अजिबात तुमची काळजी नाही. ते तुमचं कधीच ऐकणार नाहीत. विरोधकांना माझी विनंती आहे की, सर्वसामान्यांना दापदडप करू नका. कार्यकर्त्यांना धमकी देऊ नका. सर्वांना विनंती आहे मतदानाच्या दिवशी कोणाला घाबरु नका. निर्भयपणे मतदान करा एवढीच विनंती आहे. गावागावात भरभरून स्वागत होत आहे, हे जे आहे ते खरे प्रेम आहे असेही बप्पा म्हणाले.

गावागावात उत्स्फूर्त स्वागत; बैलगाडीतून मिरवणुकामहाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांचा प्रचार दौरा केला. या दौऱ्यात गावागावात त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात बैलगाडीतून गावभर मिरवणूक काही काढण्यात आल्या यावेळी झालेल्या कॉर्नर बैठका आणि सभांना गावातील महिला पुरुषांसह लहान थोरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सरकारी कामगार कार्यालयात कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

बीड येथील सरकारी कामगार कार्यालय मध्ये दिनांक एक मे रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यालयाचे ध्वजारोहण येथील कामगार अधिकारी श्री एस जी मुंडे यांनी केले याबद्दल अधिक माहिती अशी की दिनांक एक मे रोजी सरकारी कामगार कार्यालय मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन याचे औचित्य साधून विविध कार्यक्रम घेण्यात आले कार्यालयाचे ध्वजारोहण येथील सरकारी कामगार अधिकारी श्री एस जी मुंडे यांनी केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री काशीद यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुरेश चव्हाण यांनी केले कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात काम करायचे अधिकार व कर्तव्य यावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला सरकारी कामगार विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार सुरज गार्डी यांनी केले महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# शुभ सकाळ...शुभ मतदान...

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ एप्रिल**

आपल्या शरीराच्या बळकटीकरणासाठी जसे मॉर्निंग वॉक आवश्यक आहे, त्याप्रमाणे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान करने आवश्यक आहे. त्यामुळे मॉर्निंग वॉक करता करता मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी शुक्रवारी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले, यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनातून स्वीप उपक्रमांतर्गत पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत मॉर्निंग वॉक झाल्यावर मतदान करूनच घरी जाऊया अशा संदेशाचे पत्रकाचे आज प्रकाशन करण्यात आले.शहरातील प्रमुख मॉर्निंग वॉकच्या ठिकाणी बागेमध्ये, मैदानाच्या ठिकाणी हे पत्रक लावण्यात येतील. मतदानाचा दिवस सोमवार दिनांक १३ मे असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतची आहे.

## पत्रकारांनी घेतली मतदान करण्याची शपथ

शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी उपस्थित पत्रकारांनाआम्ही भारतीय नागरिक लोकशाहीवर आमचा विश्वास असल्याने आमच्या निवडणुकांचा दर्जा उचलून धरू .....कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करू मतदान करू अशी प्रतिज्ञा घेत आहोत. अशी मतदान जागरुकतेची शपथ दिली. यावेळी बीड जिल्ह्यातील प्रमुख दैनिकांचे पत्रकार उपस्थित होते.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 18 - Jalna Parliamentary Constituency | Raosaheb Dadarao Danve | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NC/587/2016 | Section (s) 17 (B) Indian Penal Code & Section 22(1) Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act 1965. | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **18 - Jalna Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**